ठाणे | मुंबई | रायगड | पुणे | नाशिक | औरंगाबाद | संस्थापक संपादक - कुंदन गोटे | मालक - शुभम कुंदन गोटे

facebook.com/dainikloknayak

सत्यमेव जयते

बहुजनरत्न
# लोकनायक

ठाणे | रविवार २९ सप्टेंबर २०२४ | वर्षे ११ | अंक ३४० | मुल्य ३ रुपये | पाने ८ | RNI No - MAHMAR/2006/17652

**संपर्क कार्यालय**

दैनिक बहुजनरत्न लोकनायक चे संपर्क कार्यालय नवीन जागेवर सुरु करण्यात आले असून बातम्या, जाहीरातींसाठी नव्या जागेत संपर्क साधावा.

- कार्यालयाचा पत्ता -

१०२ शिवानंद उद्योग संकुल, भाटिया कंपाउंड, मखमली तलावाजवळ, आग्रारोड ठाणे (पश्चिम).

संपर्क - ९८६७०२४६२४ | ९६६९९५४९८९ | ९०८२१९३७२६

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुका कधी होणार?

## निवडणूक आयोगाने दिले संकेत

मुंबई | प्रतिनिधी

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर राज्यात दौरा केला. यावेळी त्यांनी राज्यातील ११ राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. त्याचबरोबर राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, जिल्हा अधिकारी यांच्याकडून तयारीचा आढावा घेतला, अशी माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी आज (दि. २८) पत्रकार परिषदेत दिली. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, "महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी आम्ही येथे आलो आहोत.**




आम्ही या दौऱ्यादरम्यान राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. आम्ही भागधारक, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि डीजीपी यांची भेट घेतली. आम्ही बसपा, आप, सीपीआय (एम), काँग्रेस, मनसे, सपा, शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना अशा एकूण ११ पक्षांच्या नेत्यांची भेट घेतली. त्यांनी निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्यापूर्वी दिवाळी, देव दिवाळी आणि छठपूजा यासारख्या सणांचा विचार करावा, अशी सूचना केली आहे." राज्यात ९.५९ कोटी मतदार राज्यात २८८ विधानसभा मतदारसंघआहेत. राज्यात ९.५९ कोटी मतदार आहेत. ८ लाख १८६ मतदान केंद्रे आहेत. तर महिला मतदारांच्या संख्येत वाढ झाली आहे. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपणार आहे. त्यापूर्वी निवडणुकीची प्रक्रिया करावी लागणार आहे, असे त्यांनी सांगितले. आगामी काळात राज्यात दिवाळी, दसरा या सारखे मोठे सणवार येत आहेत. त्यामुळे निवडणुकांची तारीख जाहीर करताना याचा विचार करण्यात यावा. सण, उत्सव लक्षात घेऊन निवडणुकांच्या तारखांची घोषणा करण्याची विनंती पक्ष नेत्यांनी केल्याचे त्यांनी सांगितले. राजकीय पक्षांकडून महत्त्वपूर्ण सुचना निवडणुकीत पैशांचा वारेमाप होणारा वापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्ग़ात यावी. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास मनाई करण्यात यावी. आठवड्याच्या मधल्या काळात निवडणूक घेण्यात याव्यात. फेक न्यूज रोखण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी. मतदान केंद्रावर सोयी-सुविधा देण्यात याव्यात. वृद्ध मतदारांना मतदान केंद्रात जाण्यासाठी व्यवस्था करण्ग़ात यावी, अशा महत्त्वपूर्ण सुचना राजकीय पक्षांनी केल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकांच्यापूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी मुंबईत दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य शासनावर कठोर ताशेरे ओढत निवडणुकांच्या बदल्या टाळल्याबद्दल खुलासा मागितला असून गेल्या लोकसभा निवडणुकीत मतदान केंद्रांवर आढळलेल्या गैरसोयींबद्दलही तीव्र नाराजी व्यक्त केली. केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी मुंबईत दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी विविध यंत्रणांच्या बैठका घेतल्या. मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, केंद्रीय निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू, राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी. प्रदीप बैठकीला उपस्थित होते. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी विधानसभा निवडणुकीबाबत आतापर्यंत केलेल्या तयारीची माहिती बैठकीत दिली. पोलिस व्हॅन, ॲम्ब्युलन्समधूनही पैसे जाऊ शकतात; ठेवा करडी नजर विधानसभा निवडणुकीत रोख रकमेची ने-आण करण्यासाठी पोलिस व्हॅन किंवा रुग्णवाहिकांचा वापर होऊ शकतो. हे विचारात घेऊन रोख रकमेचा हा प्रवास रोखण्यासाठी विशेष काळजी घेण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या. कठोर निगराणी ठेवतानाच पैशांचा प्रसार थांबविण्यासाठी परिणामकारक उपाय योजण्याचा सल्लाही आयोगाने दिला. प्रचारकाळात व्हीआयपींसह सर्वांचे हेलिकॉप्टर तपासा विधानसभेच्या रणधुमाळीत सर्व हेलिकॉप्टर्स तपासा, व्हीआयपी म्हणून कुणालाही सूट नको. सर्वच नेत्यांच्या, स्टार प्रचारकांच्या हेलिकॉप्टरची कसून तपासणी करा, अशा सक्त सूचना केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी प्रशासन आणि तपास यंत्रणांना दिल्या. गेल्या लोकसभा निवडणुकीत नाशिक दौऱ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमधून मोठ्या बॅगा गेल्या. मात्र, त्यांची तपासणी झाली नव्हती.

# “ठाकरे गटाला महाविकास आघाडीत फक्त ४४ जागा मिळतील”; प्रकाश आंबेडकर

मुंबई | प्रतिनिधी

### तृणमूलचे खासदार डेरेक ओब्रायन यांची मागणी



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांच्या तयारीला, बैठकांना, चर्चांना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे-प्रतिदावे, आरोप-प्रत्यारोप सुरू असून, आता तिसऱ्या आघाडीचा पर्याय राज्यातील जनतेसमोर येणार आहे. संभाजीराजे छत्रपती, बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांनी एकत्रित येत परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी उघडली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर या तिसऱ्या आघाडीत सामील होऊ शकतात, अशा चर्चा आहेत. यातच ठाकरे गटाला महाविकास आघाडीत ४४ जागा मिळतील, असा मोठा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकारांशी बोलताना याबाबत दावा केला. विधानसभा निवडणुकीच्या जागांसाठी काँग्रेस असे ठरवत आहे की, १५० जागांच्या खाली यायचे नाही. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांनी असे ठरवले आहे की, ८८ जागांच्या खाली यायचे नाही. त्यामुळे आपण जर या दोन्ही पक्षाच्या जागांच्या मागणीचा विचार केला तर शिवसेना ठाकरे गटाला महाविकास आघाडीत फक्त ४४ जागा मिळतील. एवढ्या जागा ठाकरे गटाला सोडायला ते तयार असल्याची परिस्थिती आहे. आता हा फॉर्म्युला समोर येत असल्यामुळे यावरून आणखी राजकारण होईल. काही ओबीसींच्या नेत्यांनी सांगितले की, सर्वात मोठा पेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसमोर असणार आहे, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला.

वंचित बहुजन आघाडीशिवसेना ठाकरे गटाबरोबर जाणार का?

आगामी विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी शिवसेना ठाकरे गटाबरोबर जाणार का? असा प्रश्न प्रकाश आंबेडकर यांना करण्यात आला. आम्ही कोणाबरोबर जाणार आहोत, हे आम्ही सांगितले आहे. आदिवासींचे संघटन होत आहे, त्यांच्याबरोबर वंचित बहुजन आघाडी जात आहे. विविध जिल्ह्यांमध्ये ओबीसींच्या काही संघटना आहेत.

# माझी वसुंधरा अभियानात यवतमाळ पालिका राज्यात दुसरी

यवतमाळ

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्पर्धा घेण्यात आली. हे अभियान राबविण्यात यवतमाळ नगर परिषद राज्यात दुसऱ्या क्रमांकाची ठरली आहे. यामुळे नगरपालिकेला पाच कोटींचे बक्षीस मिळाले आहे. यासोबतच जिल्ह्याचाही या अभियानात अमरावती विभागात दबदबा असून, पहिला क्रमांक मिळाला. माझी वसुंधरा अभियान हे १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. १ ते ३ लाख लोकसंख्या असणाऱ्या नगर परिषदेच्या गटात यवतमाळ शहराने राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. हे अभियान तत्कालीन मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर यांच्या काळात राबविण्यात आले होते. यासोबतच वणी व दारव्हा नगर परिषद, मारेगाव आणि बाभूळगाव नगर पंचायतीने अमरावती विभाग स्तरावर गुणांकन प्राप्त केले आहे.

## फास्ट न्यूज

### "मला क्लीन चिट मिळाल्यामुळेच चांदीवाल आयोगाचा अहवाल दडवला" - अनिल देशमुख

पुणे: गृहमंत्री असताना मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांनी माझ्यावर १०० कोटी रुपये वसुलीचा आरोप केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. या संपूर्ण चौकशीनंतर आयोगाने दिलेल्या अहवालात मला क्लीन चिट देण्यात आली. मात्र राज्य सरकारने हा अहवाल मला क्लीन चिट मिळाल्यामुळे जाणीवपूर्वक दडवून ठेवला असल्याचा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. या अहवालासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य सचिव यांना कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली असून, पुढील दहा दिवसात हा अहवाल सार्वजनिक करावा अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा देशमुख यांनी दिला.

# इस्त्रायलने हिजबुल्लाच्या प्रमुखाला ठार मारले ; इराण घाबरला



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना कडेकोट बंदोबस्तात देशातील सुरक्षित स्थळी नेण्यात आले आहे. हे पाऊल अशावेळी उचलण्यात आले आहे जेव्हा इस्रायलने हवाई हल्ल्यात हिजबुल्लाह प्रमुख सय्यद हसन नसराल्लाहला ठार केल्याचा दावा केला आहे. या बातमीने संपूर्ण मध्यपूर्वेत खळबळ उडाली असून तणाव शिगेला पोहोचला आहे. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायलच्या या मोठ्या कारवाईनंतर भविष्यातील रणनीती ठरवण्यासाठी इराण लेबनॉनच्या हिजबुल्लाह गट आणि इतर प्रादेशिक गटांच्या सतत संपर्कात आहे. नसराल्लाहच्या मृत्यूची पुष्टी झाली तर हा केवळ हिजबुल्लालाच नव्हे तर इराणमधील त्याच्या समर्थकांनाही मोठा धक्का असेल. नसरल्लाह हा गेल्या 32 वर्षांपासून हिजबुल्लाहचा नेता होता आणि मध्यपूर्वेत आपला प्रभाव वाढवण्यासाठी इराण बराच काळ त्याला पाठिंबा देत होता. इस्रायली सैन्याने एका निवेदनात म्हटले आहे की, दक्षिणी बेरूतच्या दहियाह भागातील निवासी इमारतीच्या खाली भूमिगत मुख्यालयावर हल्ल्यात नसराल्लाह मारला गेला आहे. या हल्ल्यात हिजबुल्लाहचा आणखी एक वरिष्ठ नेता अली कराकी आणि अनेक कमांडरही मारले गेले. इस्रायली लष्कराने दावा केला आहे की, हिजबुल्लाचे सर्वोच्च नेतृत्व इस्रायली नागरिकांविरुद्ध दहशतवादी कारवायांची योजना आखत असतानाच हा हल्ला करण्यात आला आहे. शुक्रवारी दहियाहवर झालेल्या हवाई हल्ल्याने बैरूत हादरले. लेबनॉनच्या एका सुरक्षा सूत्राने सांगितले की, या हल्ल्यात एकापाठोपाठ एक अतिशय शक्तिशाली स्फोट झाल्यामुळे किमान 20 मीटर खोल खड्डा तयार झाला, त्यानंतर शनिवारी

# परतीचा पाऊस बिघडवणार मुंबईकरांचे आरोग्य !

मुंबई | परतीच्या पावसाने मुंबईकरांची अक्षरशः दाणादाण उडवलेली असतानाच आता तुंबलेल्या पाण्यामुळे लेप्टो, मलेरिया, डेंग्यूच्या आजारांना निमंत्रण मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मुंबईकरांचे आरोग्य बिघडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. परतीच्या पावसाने दोन दिवसांपूर्वी मुंबईत धुमशान घातले. यावेळी ठिकठिकाणी तुंबलेल्या पाण्याचा निचरा झाला असला तरी, या पाण्यामुळे आजारांना निमंत्रण मिळणार आहे. तुंबलेल्या पाण्यातून लाखो मुंबईकरांनी कशीबशी वाट काढत घर गाठले. पण हे तुंबलेले पाणी किती घातक आहे, याची कल्पना मुंबईकरांना नाही. तुंबलेले पाणी केवळ पावसाळी नसून गटार तुंबल्यामुळे हे पाणीही रस्त्यावर आले होते. या पाण्यात उंदीर, घूस व अन्य जनावरांचे मलमूत्र मिसळलेले असल्यामुळे या पाण्यातून गेल्यामुळे लेप्टोची लागण होण्याची भीती असते. विशेष म्हणजे ज्याच्या पायाला जखम असेल अशांना लेप्टोचा धोका अधिक असतो. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसांत लेप्टोचे रुग्ण वाढण्याची भीती कीटकनाशक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. केवळ लेप्टोच नव्हे, तर तुंबलेले पाणी जेथे साठून राहिले आहे. तेथे मलेरिया, डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसांत मलेरिया, डेंग्यूच्या रुग्णांमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. डेंग्यू-मलेरियाचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती ही साचलेल्या पाण्यातच होते. अगदी साचलेल्या चमचाभर पाण्यातही डासांची उत्पत्तीस्थळे आढळून येतात.

# “लाडकी बहीण नाही, लाडकी खुर्ची योजना, तिघे भाऊ लबाड आहेत”; ठाकरे गटाची खोचक टीका

नागपूर | प्रतिनिधी

### विदर्भातील विविध जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांचा बैठकी...




'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून सरकारकडून महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतात. या योजनेत आतापर्यंत कोट्यवधी महिलांनी अर्ज केले आहेत. तसेच कोट्यवधी रुपयांचा निधी महिलांच्या खात्यात वळते करण्यात आला आहे. लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अजून सुरू आहे. ३० सप्टेंबरपर्यंत या योजनेची मुदत वाढवण्यात आली होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मुदत आणखी वाढवली जाऊ शकते, अशी चर्चा आहे. मात्र, या योजनेवरून ठाकरे गटाने महायुतीवर खोचक टीका केली आहे.

ठाकरे गटाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी महायुतीवर खोचक शब्दांत टोलेबाजी केली आहे. जागावाटप समितीमध्ये नाही, त्यात हस्तक्षेप करत नाही. २६ जागा दिल्या आहेत, ५६ विधानसभा मतदारसंघावर आमचे लक्ष आहे. ५६ पैकी ३६ जागा निवडून आणण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. उद्धव ठाकरे घनश्याम मक्कासरे यांच्या संस्थेत शिवाजी महाराज पुतळा उद्घाटनाला येत आहे. वेळ मिळाल्यास नागपूर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी निवडणुकी संदर्भात त्यांच्याशी संवाद साधतील, असे भास्कर जाधव यांनी म्हटले आहे. विदर्भाचा संपर्क नेता म्हणून निवड झाल्यानंतर जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी विदर्भातील विविध जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांचा बैठकी घेत आहे, असे भास्कर जाधव यांनी सांगितले. लाडकी बहीण नाही, लाडकी खुर्ची योजना, तिघे भाऊ लबाड आहेत राज्यात महिलांसाठी सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण ही योजना नाही तर ती लाडकी खुर्ची योजना आहे. १ कोटी १३ लाख ३२३ महिलांना याचा लाभ मिळणार असून ५ कोटी महिला मात्र वंचित राहणार आहेत. देवा भाऊ, नाथ एकनाथ, दादा असे तिघेही या योजनेचे श्रेय घेत असले तरी तिघेही भाऊ लबाड आहेत, अशी टीका ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केली. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने महिला, शेतकरी आणि युवकांसाठी विविध योजना जाहीर केल्या तरी सर्व योजनाचा त्यांना निवडणुकीत काहीच फायदा होणार नाही. जनतेचा त्यांच्यावर विश्वास नाही.

### माटुंगा येथील मंदिर भाविकांसाठी बंद...

# मुंबईतील बंदोबस्तात वाढ, धार्मिक स्थळांवर करडी नजर

मुंबई | प्रतिनिधी



मुंबईमधील प्रार्थनास्थळे, विशेषत: शहरातील मशिदी आणि मंदिरांमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गुप्ताचर विभागाने दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारीची उपाययोजना म्हणून मुंबईतील बंदोबस्तात वाढ करण्यात आली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी हाजीअली दर्ग्याच्या कार्यालयात दूरध्वनी करून एकाने बॉम्ब ठेवल्याची धमकी दिली होती. त्यामुळे गर्दीची ठिकाणे आणि प्रार्थनास्थळ परिसरात मॉक ड्रिल करण्यात येणार असून सर्व पोलीस उपायुक्तांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवले आहे,

दक्षिण मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तथापि, ही कारवाई एक सुरक्षा कवायत होती. आगामी सणासुदीचा काळ आणि लवकरच होवू घातलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन क्रॉफर्ड मार्केट आणि शहरातील इतर महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा कवायती करण्यात येत आहेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले. मात्र अधिक तपशीलवार माहिती देण्यास पोलिसांनी नकार दिला.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने चेंबूरमधील मंदिराच्या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली, तर पोलिसानी सकाळी तपासणी केल्यानंतर माटुंगा येथील मंदिर भाविकांसाठी बंद करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याद्दष्टीने मुंबईत कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

हाजी अली दर्गा धमकी प्रकरणी गुन्हा

हाजी अली दर्ग्याचे प्रशासकीय अधिकारी मोहम्मद अहमद ताहेर शेख (४२) यांच्या तक्रारीवरून ताडदेव पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला. भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२), ३५२, ३५३(२), ३५३(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मंगळवारी व बुधवारी दोन धमकीचे दूरध्वनी आरोपीने केले होते. त्यासाठी दोन वेगवेगळ्या मोबाइलचा वापर करण्यात आला होता. पण दूरध्वनी करणारी व्यक्ती एकच असल्याचे तक्रारीत शेख यांनी म्हटले आहे.

# “पुण्याचं वैशिष्ट्य विचारलं की लोक म्हणतात कोयता गँग” - शरद पवार

पुणे | कोयता गँगची दहशत मध्यंतरीच्या काळात पुण्यात मोठ्या प्रमाणावर पाहण्यास मिळाली होती. त्यासंदर्भातल्या बातम्याही समोर आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी याच कोयता गँगच्या मुद्द्यावरुन राज्य सरकारवर टीका केली आहे. पुण्यात बोलत असताना ते म्हणाले की विद्येचं माहेरघर अशी पुण्याची ओळख होती. आज काल पुण्याचं वैशिष्ट्य काय विचारलं तर लोक म्हणतात कोयता गँग. असं म्हणत त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. “आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी पुण्यात काय केलं आहे? मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो, पार्लमेंटचा सदस्य आहे म्हणून दिल्लीला जातो. महाराष्ट्रातली वर्तमानपत्रं मागवून घेतो, टीव्ही लावतो. तेव्हा काय बघायला मिळतं? पुण्याची चौकशी करतो तेव्हा लोक वैशिष्ट्य काय सांगतात? कोयता गँग. टेल्कोसारखा कारखाना, बजाज सारखा कारखाना, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचं वैशिष्ट्य, विद्येचं माहेरघर हे पुण्याचं वैशिष्ट्य पण सत्ताधाऱ्यांनी ओळख काय केली आहे? तर कोयता गँग.” असं म्हणत शरद पवारांनी महायुतीवर टीका केली. माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश त्यावेळी शरद पवार यांनी हे वक्तव्य केलं. कोयता गँग आता भाषणामध्ये कोणी सांगितलं जर अलीकडच्या काळामध्ये नवी पिढी काय करतात मला माहित नाही. कसल्या तरी गोळ्या असतात ते खाल्लं की एकदम चंद्रावर जातो आणि ते चंद्रावर जाण्याचा उद्योग आज पुण्याच्या भागांमध्ये व्हायला लागला आहे. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्ज व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत. यामुळे पुणे आणि पुण्याची नवी पिढी ही उध्वस्त होणार या प्रकारचे चित्र या ठिकाणी दिसते. आज हा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. असंही शरद पवार म्हणाले.

# चांदिवलीत भाजपच्या सेवापखवाडा अंतर्गत रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन

मुंबई | प्रतिनिधी




देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष आवाहनानुसार सेवा पखवाडा अंतर्गत भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठान आणि अहिमसा विश्व भारती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चांदिवली भाजप मंडळ आणि मुंबई अल्पसंख्यांक मोर्चाच्या विशेष सहकार्याने साकीनाका येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या विश्व भारती अहिमसेचे संस्थापक रक्तदान, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यात समर्पित असलेले आचार्य डॉ. लोकेश मुनीजी महाराज, राज्यसभा खासदार, चंडीगढ विद्यापीठाचे कुलपती आणि भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतनाम सिंह संधू, मुंबई भाजपचे महासचिव आणि महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री संजय उपाध्याय, चांदिवलीचे कार्यतत्पर आमदार दिलीप मामा लांडे, सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली, मुंबई भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वसीम आर खान, चांदिवली मंडळाचे अध्यक्ष प्रकाश देवजी मोरे, उत्तर मध्य मुंबई जिल्हाचे उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, माजी नगरसेवक सीताराम तिवारी, प्रभाग अध्यक्ष प्रशांत मौर्य, महेश चौगुले, युवा मोर्चाचे मंडल अध्यक्ष अभिषेक सिंह, अमेय दोंदे, उत्तर पश्चिम जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष हुसेन खान. पठाण, अग्नेलो फर्नांडिस, अल्ताफ खान, इम्रान खान, जेपी शेट्टी, मंदा ताई राठौर, साधना शर्मा, सुरेंद्र यादव, भावेश भानुशाली, आदिल खान, हितेश जैन, खाबरा, रेश्मा चौघुले, प्राजक्ता साने, रंजना राणे दास, वीरेंद्र दुबे, गायकवाड, सुभेदार यादव, नितीन कांबळे, परशुराम शिंदे, संजय यादव, स्वप्नील पवनकर, राधेश्याम यादव, अजय शेलार, सामाजिक कार्यकर्ते संपत अण्णा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याचा बंधारा भूमिपूजन प्रसंगी आमदार समीर कुणावार यांचे भावनिक उदगार



छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी

मजुरीमध्ये झालेली वाढ व बांधकाम विभागाची चालू दरसूची विचारात घेऊन शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सिंचन विहिरीसाठी ४ लाखांवरून ५ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हा निर्णय १ एप्रिल २०२४ पासून लागू झाल्यामुळे यापूर्वीचे सुमारे २७ हजार विहिरींचे लाभार्थी वाढीव अनुदानाला मुकले आहेत. पूर्वी सिंचन विहिरीचे अनुदान ३ लाख होते. त्यात नोव्हेंबर २०२२ मध्ये वाढ करून ४ लाख करण्यात आले. दरम्यान, अलिकडे मजुरीच्या दरात झालेली वाढ व बांधकाम विभागाची चालू दरसूची लक्षात घेऊन शासनाने गेल्या महिन्यापासून ५ लाखांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये ६ हजार ६९०, तर सन २०२३-२४ मध्ये २७ हजार २३५ सिंचन विहिरींना प्रशाकीय मान्यता दिली होती.

## छोट्या बातम्या

### आईचा खून करुन मृतदेह फेकला जंगलात; मुलाविरुद्ध गुन्हा

भंडारा | लाखांदूर तालुक्यातील दांडेगाव जंगलात एका अज्ञात महिलेचा मृतदेह गुरुवारी सकाळी आढळून आला होता. सदर महिलेची ओळख पटली असून तिच्याच मुलाने तिचा खून करुन मृतदेह पोत्यात भरुन जंगलात फेकून दिल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी आरोपी मुलाविरुद्ध दिघोरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

चित्रलेखा उर्फ रेखा अरूण वासनिक (वय ४५, रा. दिघोरी मोठी) असे मृत महिलेचे नाव आहे. तर सुमित अरूण वासनिक (वय २५) असे संशयित मुलाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चित्रलेखासोबत मुलगा सुमित नेहमीच भांडण करीत होता. ६ मे २०२४ ते २६ सप्टेंबर २०२४ दरम्यान सुमितने दररोजच्या भांडणावरुन आई चित्रलेखाचा खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह प्लास्टीक पोत्यात भरुन १५ किलोमीटर लांब दांडेगावच्या जंगलात फेकून दिला. पोलिसांनी आरोपी सुमित वासनिकविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविला असून तपास उपविभागीय पोलिस अधिकारी मनोज सिडाम करीत आहेत.

### वाल्हे, दौंडज परिसरातील जलसाठे अद्याप कोरडेच

पुणे | मागील तीन-चार दिवसांपासून पुरंदर तालुक्यातील अनेक भागांत दमदार पाऊस पडत आहे. मात्र, अजूनही दौंडज खिंड, दौंडज परिसर, वाल्हे परिसरामधील वाड्या-वस्त्या, पिसुर्टी, हरणी, वागदरवाडी, सुकलवाडी, राख, नावळी, गुळूंचे, कर्नलवाडी भागात अद्यापि समाधानकारक पाऊस पडला नाही. त्यामुळे येथील ओढे-नाले, विहिरी, कुपनलिका, तलाव, बंधाऱ्यांत पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झाला नाही.

वाल्हे गावच्या पूर्वेकडील वाड्या-वस्त्यांवर तसेच दौंडज व दौंडज खिंड परिसरातील डोंगर भागात यंदा पुरेसा पाऊस पडला नाही. या परिसरात रिमझिम पावसावरच खरीप हंगामातील पिके घेण्यात आली. मागील दोन महिन्यांपूर्वी दौंडज खिंड परिसरात झालेल्या रिमझिम पावसाने येथील बंधारे भरून ओसंडून वाहत होते. मात्र पुन्हा पावसाने ओढ दिली आणि येथील जलसाठ्यांनी तळ गाठला. त्यामुळे शेतकरीवर्गाची चिंता वाढू लागली आहे. वाल्हेच्या पश्चिम दिशेस 10 किलोमीटर अंतरावर असलेले वीर धरण मागील महिन्यात भरून निरा नदी तुडुंब वाहत आहे. मात्र, वाल्हे, दौंडज गाव तसेच परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये समाधानकारक पाऊस पडलेला नाही. पावसाळा संपत आला आणि येथील जलसाठे कोरडे पडू लागले आहेत. मागील वर्षासारखीच पाणीटंचाईची पुनरावृत्ती उद्भवते की काय ? अशी चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. दरवर्षी गणपती, नवरात्रोत्सवादरम्यान या भागात पाऊस चांगला होतो. मात्र, गणेशोत्सवात पावसाने पूर्णपणे उघडीप दिली. आता मागील तीन-चार दिवसांपासून या परिसरात रिमझिम पाऊस अधूनमधून पडत आहे. मात्र मुसळधार पाऊस पडत नाही. नवरात्रोत्सवात तरी समाधानकारक पाऊस पडेल, अशी आशा शेतकरीवर्गाला लागून राहिली आहे.

### हिंगणघाट विधानसभेत तुतारी पर्वाची सुरुवात.... वाजतेय तुतारी.. वाजणार तुतारी!




हिंगणघाट | सिंदी रेल्वे विभागातील हजारो नागरिकांनी हिंगणघाट येथे भव्य रॅली काढत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात पक्ष प्रवेश केला . सिंदी रेल्वे येथून पन्नास गाड्यांच्या ताफ्याने पक्षप्रवेश करण्यासाठी सिंदी रेल्वे कर हिंगणघाट शहरात दाखल होते..कार्यकर्त्यांच्या उत्साहात झालेल्या या अनोख्या पक्षप्रवेशाची हिंगणघाट शहरात व सिंदी रेल्वे शहरात जोरदार चर्चा.ढोल ताशाच्या गजरात हिंगणघाट शहरात रॅली काढून अतुल वांदिले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हजारोंच्या संखेने हा पक्षप्रवेश झाला। जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या उपस्थितीत स्थानिक महावीर भवन येथे संपन्न झाला. राष्ट्रवादीचे पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करु इच्छित असणारे सिंदी रेल्वे विभागातील हजारो नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सहभागी झाले. हा भव्य पक्षप्रवेश सोहळा महावीर भवन हिंगणघाट येथे झाला. आमच्यासोबत इतके लोक जोडले जात आहेत, यामुळे आम्हाला पक्षाचे काम अधिक जोमाने करण्यासाठी ऊर्जा मिळत आहे. असे मनोगत प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी व्यक्त केले. या वेळी उपस्थित लोकांमध्ये मोठा उत्साह पाहायाला मिळाला. येत्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मतदारांसमोर एक चांगला पर्याय उपलब्ध असेल. असे मनोगत जिल्हाध्यक्ष तुम्ही राऊत यांनी व्यक्त केले.

## नाट्यगृहांमध्ये दाखवा चित्रपट! उत्पन्न वाढेल गार्गी फुलेंचा मुनगंटीवारांकडे प्रस्ताव

उल्हासनगर | प्रतिनीधी



भारतीय बौध्द महासभा, राष्ट्रीय संरक्षक महाउपासिका मीराताई आंबेडकर, ट्रस्ट चेअरमन डॉ हरीष रावलिया, राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर, यांच्या आदेशानुसार भारतीय बौध्द महासभेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड गुरूजी, सरचिटणीस प्रभाकर सुर्यवंशी सर, संघटक छगन सुरवाडे गुरूजी, यांच्या मार्गदर्शनाखाली , उल्हासनगर - ३ मध्ये सुभाष नगर शाखा पंचशील बुध्द विहारात शुक्रवार दि, २७ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय बौध्द महासभा सुभाष नगर शाखेच्यावतीने नवीन कार्यकारणीची बैठक आयोजन करण्यात आली होती तसेच उल्हासनगर तालुका अध्यक्ष रोशन पगारे, सरचिटणीस लक्ष्मण मोरे, कोषाध्यक्ष जीवन मोरे, उपाध्यक्ष देविदास कांबळे, सचिव सोमाजी खैरनार, भास्कर सरोदे, दिलीप शिंदे, तांबे , रमेश वानखेडे, उल्हासनगर तालुका महिला अध्यक्षा कल्पनाताई वानखेडे, यांच्या उपस्थितीत सुभाष नगर शाखेची नवीन कार्यकारणी निवड करण्यात आली तसेच भारतीय बौध्द महासभा सुभाष नगर शाखेचे नवीन अध्यक्ष अशोक एफ शिरसाट, सरचिटणीस परसराम ओंकार, कोषाध्यक्ष बेबीताई थोरात, संस्कार उपाध्यक्ष प्रमोद राजगुरु, संस्कार सचिव सुनिताताई कांबळे , पर्यटन सचिव शशिकांत आढांगळे संरक्षण सचिव छायाताई म्हस्के, कार्यलयानीस सचिव शरद जाधव, हिशोब तपासणीस प्रकाश कांबळे, यांच्यासह आदी कार्यकर्ते यांची निवड करण्यात आली होती तसेच या निवड बैठकीत माजी अध्यक्ष एफ ए शिरसाट, यांच्यासह उपासिका, उपासक, यावेळी उपस्थित होते.

## लोअर परळच्या 520 कोटींची नवीन कार पार्किंग मध्ये 300 कोटीचे नुकसान

मुंबई | प्रतिनिधी

एलेव्हेटेड मल्टीलेव्हल इलेक्ट्रोमेकॅनिकल कार पार्किंग सिस्टीम (शटल आणि रोबो पार्कर सिस्टीम) माटुंगा, मुंबादेवी, फोर्ट आणि वरळी अंतर्गत यापूर्वी झालेले नुकसान लक्षात न घेता पुन्हा जी दक्षिण लोअर परळ येथील ASPHALT प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे जारी केलेली निविदा रद्द करत कंत्राटदार आणि अधिकारी यांचे संगनमत लक्षात घेता कारवाई करण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी केली आहे. 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग असणार आहे. आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालिका आयुक्त भूषण गगराणी यांस पाठविलेल्या पत्रात उल्लेख केला आहे की यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेत अधिकारी वर्गाने जी दक्षिण लोअर परळ येथील ASPHALT प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे नवीन निविदा जारी केल्या आहेत. प्रत्येक कार मागे 95 लाख खर्च येत आहे. यामुळे या निविदेत 300 कोटींचे नुकसान होईल. या निविदेतही मूळ उपकरणे उत्पादन भागीदार सर्व निविदाकारात एकच म्हणजे मेसर्स सोटेफिन पार्किंग प्रायव्हेट लिमिटेड असेल यात काडीमात्राची शंका नसेल.यापूर्वी पालिकेने कार्यादेश दिले आहेत त्यात माटुंगा, फ्लोरा फाउंटन आणि वरळी याचा समावेश आहे. फ्लोरा फाउंटन ( विशाल कंन्स्ट्रकॅशन ) येथे 70 कोटीत 176 कार पार्किंगचे देण्यात आले आहे. प्रति कार हा खर्च 39.77 लाख आहे. वरळी ( श्री इंटरप्रायझेस ) येथे 640 कार पार्किंगचे काम 216.94 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 33.90 लाख आहे तर माटुंगा ( रेलकोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट) येथे 475 कार पार्किंगचे काम 103.87 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 21.87 लाख आहे. त्याचशिवाय एमएमआरडीएच्या मालवणी येथे 669 कार पार्किंगचे काम 150 कोटीत देण्यात आले असून तेथे हा खर्च प्रति कार 22.42 लाख इतका आहे. अनिल गलगली यांच्या मते निविदा जारी करताना अधिकारी यांनी किंमतीचे मूल्यमापन योग्य रीतीने केले गेले नाही कारण दरांचे कोणतेही विश्लेषण केले गेले नाही किंवा विभागाने संपूर्ण भारतभर राबविण्यात येणारे इतर तत्सम प्रकल्प किंमत मूल्यांकनासाठी संदर्भ बिंदू म्हणून घेतलेले नाहीत. CPWD, NHIDCL, रेल्वे , दिल्ली महानगरपालिका, एमएमआरडीए यांसारख्या इतर सरकारी विभागांमध्ये कमी दरात समान/समान कामे करत आहेत परंतु त्यांसकडून पालिकेबाहेरील बाहेरील कामाच्या तुलनेत 200% ते 300% जास्त किंमत दिली गेली आहे. याबाबत पालिकेने या एमएमआरडीए तसेच काही केंद्र सरकारच्या संस्थांना त्यांचे बोली दस्तऐवज आणि किंमत अंदाज सामायिक करण्याची विनंती केल्यावर ते स्पष्ट होईल.

## नाशिकमधून मराठवाड्याकडे ४८ टीएमसी पाणी



नाशिक | प्रतिनिधी

पावसाने नव्याने जोर धरल्याने नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूरमधून पुन्हा एकदा विसर्ग करण्यात आला आहे. जिल्ह्यातील एकूण १२ धरणांमधून पाणी सोडण्यात आले आहे. सर्वच धरणे तुडुंब असल्याने विसर्गाशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. नांदूरमध्यमेश्वरमधून मराठवाड्यातील जायकवाडीकडे आतापर्यंत ४७ हजार ६२२ दशलक्ष घनफूट म्हणजे जवळपास ४८ टीएमसी इतक्या पाण्याचा विक्रमी विसर्ग झाला आहे. चार, पाच दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने मुक्काम ठोकला आहे. कधी विजांच्या कडकडाटात तर कधी संथपणे संततधार होत आहे. गुरुवारपासून त्याचा जोर वाढला. शहरातील रस्ते व चौकात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होत आहे. तात्पुरत्या स्वरुपात बुजविलेले खड्डे पुन्हा उघडे पडल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. जिल्ह्यातील सर्वच धरणे तुडुंब भरली आहेत. लहान-मोठ्या २४ धरणांमध्ये सध्या ६४ हजार ३४० दशलक्ष घनफूट म्हणजे ९८ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पावसाचे येणारे पाणी साठविण्यास धरणात जागा शिल्लक नसल्याचे विसर्ग करावा लागत आहे. शुक्रवारी सकाळी गंगापूर धरणातून ११६९ क्युसेकचा विसर्ग करण्यात आला. याशिवाय दारणा २००४, कडवा १६६०, भाम ११२०, वालदेवी ३०, आळंदी ३०, भावली १३५, वाघाड २२९, वाकी ११६, नांदूरमध्यमेश्वर बंधारा १५२४८, कश्यपी ३२०, करंजवण ६०२ क्युसेकचा विसर्ग करण्यात आल्याचे पाटबंधारे विभागाने म्हटले आहे. तीन समुहातील पाणी मराठवाड्याकडे गंगापूर, दारणा आणि पालखेड समुहातील धरणांचे पाणी नांदूरमध्यमेश्वरमार्गे गोदावरी नदीतून मराठवाड्यातील जायकवाडी धरणाकडे जाते. यंदा वरच्या भागात चांगला पाऊस झाल्यामुळे धरणे आधीच पूर्ण क्षमतेने भरली.

## वरठाण तलावाच्या सांडव्यास गळती

वरठाण | प्रतिनिधी



सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील तलावाच्या सांडभिंतीला मोठ्या प्रमाणावर गळती लागल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याने तलावाची पाणी कमी होत आहे उपाययोजना राबवून गळती थांबविण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

वरठाण तलावामुळे अनेक जमीन ओलितखाली आल्या आहेत. खरीप पाठोपाठ अनेक शेतकरी रब्बीचे पीकदेखील घेतात. गेल्या चार पाच वर्षांपासून तलावातील गाळ मोठ्या प्रमाणावर काढल्याने तलावात चांगल्या प्रकारे पाणीसाठा होतो, पण तलावाच्या भिंतीला काही ठिकाणी मोठमोठे भगदाड पडले. लाखो लिटर पाणी वाहून जात आहे. या वर्षी वरठाण परिसरात सुरुवातीपासून पावसाचे कमी प्रमाण कमी होते. या वर्षी तलाव भरणार की नाही अशी शंका व्यक्त करीत होते.

मध्यंतरी परिसरात अतिवृष्टी झाल्याने एका रात्रीत तलाव ओव्हरफ्लो झाला. गळतीमुळे तलाव काही दिवसांतच कोरडेठाक पडतो. याआधी देखील सांडव्यास मोठी गळती गेल्या पाच वर्षांपूर्वी गळती झाली होती. हे थांबविण्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले होत. झालेले काम दर्जेदार झाले नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पुन्हा तलावाच्या भिंतीस भगदाड पडल्याने पाणी वाहून जात असल्याने फेब्रुवारीमध्येच तलाव कोरडाठाक पड्झो. ग्रामस्थांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागते. हे दरवर्षीचे चित्र आहे.

या सांडव्याची गळती थांबवावी, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांनी केली होती. उपविभागीय अधिकारी रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा अभियंता एस.बी. बुचाले, कालवा निरीक्षक एस.डी.बारेला यांनी तलावाच्या सांडभिंतीची, गळतीची पाहणी केली. यावेळी काही शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, वरठाण लघु सिंचन प्रकल्पाची पाहणी केली असून सांडवा लिकेज झालेला आहे. याची तत्काळ दखल घेऊन सांडवा दुरुस्ती कामी वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठवण्यात आलेला आहे, अशी माहिती शाखा अभियंता एस. बी. बुचाळे यांनी दिली.

## 10 हजार लाडक्या बहिणींना भाजपा अल्पसंख्याक मोर्चातर्फे साड्या आणि सूट वाटप कार्यक्रम



मुंबई | पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु असलेल्या सेवा पखवाडा अंतर्गत भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष एस.एम.खान यांच्या मार्फत शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ओशिवरा मेट्रो स्थानकाजवळील म्हाडा मैदानावर आयोजित कार्यक्रमात १० हजार महिलांना मोफत साड्या आणि सूटचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता ताई फडणवीस आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष ॲड आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत.

## आदिवासी पारधी समाजाच्या मानखुर्दमधील वसाहतीत स्वच्छता मोहीम

मुंबई | मुंबईतील मानखुर्द येथील पारधी वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सोलापूर येथून उपस्थित झालेले प्रशासकीय अधिकारी झाकडे , सरतापे यांनी भेट देऊन मुंबईतील पारधी वसाहतीचा समस्यांचा आढावा घेतला. यावेळी आदिवासी पारधी महासंघाचे मुंबई ,नवी मुंबई अध्यक्ष व काँग्रेस पक्षाचे पारधी समाज महाराष्ट्र सेल अध्यक्ष संतोष एकनाथ पवार यांनी उपस्थित पारधी समाजाला मार्गदर्शन करताना मोलाचा सल्ला दिला. आदिवासी पारधी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब साळुंखे यांच्या निवासस्थानी भेट देऊन सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले पाहिजे, अशी मागणी यावेळी संतोष पवार यांनी लावून धरली. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यानी पारधी समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देऊन हे प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी आदिवासी पारधी मुंबई, नवी मुंबई, ठाणे ,रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. त्यावेळी नवी मुंबईतील केरला भवन समोरील आदिवासी पारधी वसाहतीच्या पुनर्वसन बाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.


## अल-हमरा ऐजुकेशनल सोसायटी संचालित अन्सारी साफिया गर्ल्स हायस्कूल- भिवंडी

अल-हमरा ऐजूकेशनल सोसायटी, भिवंडी या "अल्पसंख्यांक दर्जा" प्राप्त संस्थेच्या "अन्सारी साफीया गर्ल्स हायस्कूल नागांव, भिवंडी" या "ऊर्दू" माध्यमच्या "20%" अंशतः अनुदानीत पदावर माध्यमिक शाळेमध्ये पूर्णवेळ शिक्षिका या पदावर खालील पात्रताधारक शिक्षिकेची नियुक्ती करावयाची आहे तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक ०७.१०.२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा कार्यालय-अन्सारी साफिया गलर्स हायस्कूल- भिवंडी येथे अर्ज व मुळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| पद | विषय | गट | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | संवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्ण वेळ शिक्षक 20% अंशतः अनुदानावर | इंग्रजी व भुगोल | इ.६वी ते ८वी | B.A.B.Ed. (TET/CTET) | १ | खुला | 20% अंशतः अनुदानावर |

सही/-
मुख्याध्यापिका
अन्सारी साफिया गलर्स हायस्कूल- भिवंडी

सही/-
सचिव
अल-हमरा ऐजुकेशनल सोसायटी - भिवंडी

## WANTED TEACHERS

दि पिपल्स वेलफेअर असोसिएशन संचालित
सलाहुद्दीन अय्युबी मेमोरियल उर्दु माध्यमिक शाळा
शांतीनगर, भिवंडी, जिल्हा ठाणे.

दि पिपल्स वेलफेअर असोसिएशन, भिवंडी या अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थेच्या सलाहुद्दीन अय्युबी मेमोरियल उर्दु माध्यमिक शाळा, भिवंडी या उर्दु माध्यमाच्या १००% अनुदानित शाळेत शिक्षण सेवक व ६०% अंशत अनुदानित तत्वावर पुर्णवेळ पदांवर खालील पात्रताधारक शिक्षकांची नियुक्ती करायची आहे. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक ०९ ऑक्टोंबर २०२४, सोमवार रोजी ठिक सकाळी ११.०० वा. कार्यालय सलाहुद्दीन अय्युबी मेमोरियल स्कुल्स ॲण्ड कॉलेजेस कॅम्पस, मौलाना आझाद रोड, शांतीनगर, भिवंडी . जि. ठाणे पिन-४२१३०२ येथे अर्ज व मुळ प्रमाणपत्रांसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

| पद | रिक्त पदाचा विषय | गट | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | संवर्ग | मानधन/ वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) शिक्षणसेवक | सामजशास्त्र ( इतिहास व भुगोल) | (इयत्ता ८ वी) | एच. एस. सी./बी.ए. डी. एड / बी. एड. [TET / CTET Passed] | १ | खुला | मानधन रू.१६००० (एस-१०) |
| २) अंशत अनुदानित तत्वावर | विज्ञान | (९ वी व १० वी) | बी.एस.सी/ एम. एस. सी बी. एड. | १ | खुला | ६०% अनुदानित (८६००-१२२८००) एस-१४ |

सही/-
मुख्याध्यापिका
सलाहुद्दीन अय्युबी मेमोरियल उर्दू माध्यमिक शाळा, भिवंडी

सही/-
सेक्रेटरी
दि पिपल्स वेलफेअर असोसिएशन, भिवंडी

# स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत 'स्वच्छता रन'मध्ये धावले 1 हजारहून अधिक नवी मुंबईकर




**नवी मुंबई । प्रतिनिधी**

'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत 1 हजारहून अधिक नवी मुंबईकरांनी आज 'स्वच्छता रन' मध्ये सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानांतर्गत आयोजित केलेल्या सर्वच उपक्रमांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे. आजही नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून महापालिकेच्या आयकॉनिक मुख्यालय इमारतीसमोर आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता रन' मध्ये रात्रभर व पहाटे मोठ्या प्रमाणात पाऊस असूनही स्वच्छता ध्येयाने भारलेले हजारहून अधिक नागरिक अतिशय उत्साहाने धावले. याआधी 22 सप्टेंबर रोजी याच ठिकाणी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्येही 500 हून अधिक सायकलपटू उत्साहाने सहभागी झाले होते. आजही स्वच्छता रनमध्ये पाऊस असूनही हजारहून अधिक स्वच्छता ध्येयाने भारलेले नागरिक नमुंमपा मुख्यालयापासून वजीराणी स्पोर्ट्स क्लबपर्यंत व तेथून परत मुख्यालयापर्यंत धावले. धावणे हा सर्वोत्तम व्यायाम असून या स्वच्छता रनच्या माध्यमातून स्वच्छतेप्रमाणेच आरोग्य जपणुकीचा संदेशही प्रसारित करण्यात आला अशी भूमिका आयुक्तांनी मांडली. स्वच्छता ही प्रत्येक घरापासून सुरू झाली तर घर, परिसर, राज्य, देश स्वच्छ राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आमदार गणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे मिशन संचालक नवनाथ वाठ, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड, माजी आमदार संदीप नाईक तसेच महानगरपालिकेचे विभागाप्रमुख आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वच्छता रनच्या आयोजनात स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन श्रीम. रिचा समित यांची लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्था आणि द लर्नयार्ड या क्रीडा क्षेत्राशी संबंधित संस्थांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी स्वच्छता रन मध्ये सहभागी झालेले कन्याकुमारी ते काश्मिर धावण्याचा जागतिक विक्रम केलेले गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर संजय शर्मा यांना आयुक्तांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महापालिका अधिका-यांमधून 10 किमीची स्वच्छता रन पूर्ण करणारे प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे 10 किमी अंतराची स्वच्छता रन सर्वात जलद पूर्ण करणारे प्रथम 3 क्रमांकाचे मानकरी सुरज गोरे, मनोज गावित आणि गुणवंत जाधव यांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी महिलांमधून सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या ज्योती ठाकूर, ममता ठाकूर व सुनिता छैनानी या महिला धावपटूंना सौ. रेवती कैलास शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले. उद्या रविवार, दि. 29 सप्टेंबर रोजी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'महामार्गांची महास्वच्छता मोहीम' राबविली जात आहे. या अंतर्गत सायन पनवेल महामार्ग व ठाणे बेलापूर मार्गाची स्वच्छता सकाळी 7 पासून करण्यात येणार आहे.

## ठाणे आर टी ओं ना रिपाइं कसारा शाखेचे निवेदन

**कसारा :** गेल्या काही दिवसांपासून प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे यांच्या मार्फत कसारा- नाशिक तथा इगतपुरी-घोटी,राजूर-अकोले दरम्यान चालणा-या खाजगी प्रवासी वाहतूक मालक- चालकां विरोधात धडक कायदेशीर कारवायांचे सत्र सुरु आहे; या मुळे सर्वच वाहन मालक चालक धास्तावले असून त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. या संदर्भात रिपाइं ठाणे- पालघर या उभय जिल्ह्यांचे उपाध्यक्ष सुहास जगताप आणि शहापूर तालुका पदाधिकारी दिनेश घनघाव यांनी शुक्रवारी ठाणे आर टी ओ कार्यालयात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री काटकर यांना या दंडात्मक कारवाया थांबविण्याचे विनंती वजा निवेदन दिले आहे.मधल्या काळात काही मुजोर चालकां मार्फत प्रवाशांकडून कसारा ते नाशिक दरम्यानची तीनशे ते चारशे रुपये अशी अव्वाच्या सव्वा भाडे वसुली केली जात होती.( प्रत्यक्षात 100 ते 120 रुपये इतकेच वाजवी भाडे आहे ).अक्षरशः या दरम्यान कसारा वाहन तळावर प्रवाशांची खुलेआम लूट सुरु होती.आणि प्रवासी भाड्या बाबत इथे कोणाचेही नियंत्रण नसल्याने किंबहुना शिस्तच नसल्याने हे संतापजनक प्रकार नेहमीच विशेषतः आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी,रविवारी तसेच शासकीय सुट्ट्या सलग असल्यावर होत असतात.या बाबतच्या तक्रारी वारंवार वरिष्ठांकडे गेल्या मुळे सदर कायदेशीर कारवाया सुरु झाल्याचे म्हटले जात आहे.मात्र ठराविक माजोरड्या वाहन चालकांमुळे हातावर पोट असणाऱ्या सर्वच वाहन चालकांना परिवहन अधिका-यांच्या दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे.अनेकांनी आपली वाहने घरीच उभी करून ठेवली आहेत. म्हणजेच गव्हा सोबत किडेही रगडले जात असल्याची खंत गोरगरीब चालक व्यक्त करीत आहेत.त्यांनी रिपाइं पदाधिका-यांकडे आपली समस्या व्यक्त केल्या मुळे जिल्हा नेते सुहास जगताप यांनी सहकारी पदाधिकारी दिनेश घनघाव यांच्यासह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे श्री काटकर यांना निवेदन देऊन कारवाया स्थगित करण्याची विनंती केली आहे.

## एसटी बस ला अपघात सात; जण जखमी

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी या तीर्थक्षेत्र मध्ये छत्रपती शिवाजी चौक ते गणेशपुरी या अरुंद रस्ता वरून गणेशपुरी येथे जाणाऱ्या एसटी बस चे स्टेरिंग नादरुस्त झाल्याने गणेशपुरी येथील रस्त्यात असलेल्या एका झाडाला अदळून झालेल्या अपघातात सात जण जखमी झल्याची घटना घडली आहे. वसई आगार ची वसई जव्हार बस क्रमांक एम च 14बी टी 2383 वसई हुन गणेशपुरी जात असताना अचानक स्टेरिंग फेल झाल्या मुळे व त्यातच शिवाजी चौक ते गणेशपुरी हा रस्ता वाढत्या अतिक्रमण मुळे अरुंद झाला असल्याने चालकाचे एसटी वरील नियंत्रण सुटल्या मुळे ने सुदैवाने अचानक रस्त्या लगत असलेल्या एका झाडावर आदळलीत्यात एसटी चे मोठे नुकसान झाले असून एस टी तील सात प्रवाशांना दुःखपत झाली असून जीवित हानी टळली. अलीकडे सर्वत्र अतिक्रमण सुरु आहे गणेशपुरी चौकात मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली गेली आहेत व त्याच ठिकाणी शाळेचे विदयार्थी शाळा सुटल्यावर मोठ्या प्रमाणात उभे असतात, सुदैवाने या ठिकाणी एसटी ब्रेक नादरुस्त झाले असते तर विद्यार्थना मोठा अपघात झाला असता अशीपरिसरात सर्वत्र चर्चा सुरु आहे, या बाबत गणेशपुरी पोलीस ठाणे येथे व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी अपघाताची नोद घेतली आहे. दरम्यान अंबाडी नाका येथे खोदकाम करून बांधकामं केली आहेत अशा अतिक्रमणा मुळेच परिसरात मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत मात्र या कडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने मोठी नाराजी व्यक्त होत आहे.

## मागेल त्याला सौर कृषी पंप

**मुंबई :** मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरु केलेल्या महावितरणच्या वेबसाईटला उदंड प्रतिसाद मिळाला असून केवळ चौदा दिवसात १ लाख २२ हजार शेतकऱ्यांनी त्यावर नोंदणी केली आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना शेतकऱ्यांसाठी सुरु केली आहे. त्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता यावा यासाठी महावितरणने वेबसाईट तयार केली असून तिचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. १३ सप्टेंबर रोजी मुंबईत समारंभपूर्वक झाले होते. त्यानंतर केवळ १४ दिवसात दि. २७ सप्टेंबरपर्यंत राज्यातील १,२२,४२१ शेतकऱ्यांनी वेबसाईटवर अर्ज दाखल केले होते. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत वेबसाईटवर अर्ज दाखल करण्यामध्ये जालना जिल्ह्याने बाजी मारली आहे. जालना जिल्ह्यातून ५२,०६७ अर्ज दाखल झाले आहेत. त्यानंतर राज्यात मराठवाड्यातील बीड (२४,५२६ अर्ज), परभणी (१५,०४३ अर्ज), छत्रपती संभाजीनगर (६,८८८ अर्ज) आणि हिंगोली (५,०७९ अर्ज) या जिल्ह्यांचा क्रम लागतो. या योजनेत शेतकऱ्यांना जमिनीच्या क्षेत्रफळानुसार तीन ते साडेसात एचपीपर्यंतचे पंप मंजूर होतात. शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा सर्व संच केवळ दहा टक्के रक्कम भरून मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के आहे.

## लोकअदालतमध्ये पुन्हा रचला नवा इतिहास

**ठाणे । प्रतिनिधी**

लोक न्यायालयात पुन्हा एकदा नवा इतिहास रचला गेला. टँकरच्या धडकेत मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना एका खाजगी इन्शुरन्स कंपनीकडून साडेचार कोटींची मदत मिळवून देण्यात ठाणे लोकन्यायालयाला यश आले. मोटार अपघात प्राधीकरणाकडे हे प्रकरण दाखल करण्यात आले होते. हा दावा शनिवारी मोटार अपघात प्राधीकरणाचे सदस्य, न्यायमूर्ती एस. एन. शाह यांच्या कोर्टात निकाली काढण्यात आला. गेल्यावर्षी एका प्रकरणात २ कोटी ८५ लाखांची मदत लोकन्यायालयाने मिळवून दिली होती. अपघातात मृत पावलेली व्यक्ती (वय ३७ वर्षे) ही व्यवसायाने कम्पुटर इंजिनिअर होती आणि ती कांजुरमार्ग येथील एका खाजगी कंपनीत कामाला होती आणि काही दिवसांनी ते याच कंपनीच्या अमेरिका येथील कार्यालयात रुजू होणार आहे. मात्र त्या दरम्यान त्यांचा अपघात झाला. नावडा फाटा येथे ९.१२.२०२२ रोजी सकाळी ७.२० वाजता ते मासळी घेण्यासाठी स्कुटरवरुन जात असताना पाठीमागून एका सिमेंटच्या टँकरने धडक दिली आणि जागीच त्यांचा मृत्यू झाला. मृत व्यक्तीच्या कुटुंबियांनी ॲड. जी. ए विनोद यांच्या माध्यमातून मोटार अपघात प्राधीकरणाकडे एका खाजगी इन्शुरन्स कंपनीकडे दावा दाखल केला. ॲड. विनोद यांनी फक्त भरपाई म्हणून दावा दाखल केला. हे प्रकरण आज निकाली काढून ती अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना मिळवून देण्यात आले. या प्रकरणात इन्शुरन्स कंपनीचे अमृता सिन्हा आणि स्वप्निल पिंपळखरे यांनी देखील मेहनत घेतली. शनिवारी लोकन्यायालयात जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एन शिरसिकर, मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे एस के फोकमारे, जिल्हा विधी सेवा प्राधीकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी, मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाचे सदस्या, न्यायमुर्ती एस एन शाह , प्रथम वर्ग न्यादंडाधिकारी सुतार, के एस कातकाडे, पुजा माने, एस जी. खेतवाल यांच्या उपस्थितीत या रक्कमेचा धनादेश सुपुर्द करण्यात आला.

## माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये ठाणे जिल्हा कोंकण विभागात प्रथम; 4 ग्रामपंचायतींना बक्षिस जाहिर

**ठाणे । प्रतिनिधी**

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित "माझी वसुंधरा अभियान" हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक 2 ऑक्टोबर, 2020 पासून राबविण्यास सुरवात झाली होती. "माझी वसुंधरा अभियान 4.0" हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक 1 एप्रिल, 2023 ते दिनांक 31 मे, 2024 या कालावधीत राबविण्यात आले. जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत 431 ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवला होता. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान 4.0 याचे कामकाज करण्यात आले असून माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये ठाणे जिल्हा कोंकण विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे व जिल्हा परिषद अंतर्गत 4 ग्रामपंचायतींना बक्षिस जाहिर झाले आहे. ग्रामपंचायती अंतर्गत माझी वसुंधरा अभियान 4.0 राबवण्यासाठी ग्रामस्थानी मोलाची कामगिरी केली आहे. जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली गाव पातळीवर अभियान यशस्वी राबवण्यात आले असून गावकरी, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयातील युवक- युवती, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे. ठाणे जिल्ह्यातील 4 ग्रामपंचायतींना बक्षिस जाहिर झाले यासाठी वरिष्ठ कार्यालय, पंचायत समिती, ग्रामपंचायत येथिल अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष कामगिरी केली आहे. त्यासाठी सर्वांचे अभिनंदन करतो. – उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) प्रमोद काळे

माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये ठाणे जिल्ह्याला कोंकण विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारा जिल्हा म्हणून प्रथम क्रमांक मिळाला असून 4 ग्रामपंचायतींची कोंकण विभागामध्ये निवड झाली आहे. ग्रामपंचायत गट 10 हजार पेक्षा अधिक लोकसंख्या गटातून कोंकण विभाग स्तरावर भिवंडी तालुक्यातील काल्हेर ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांक मिळाला असून 50 लाख रुपये बक्षिस रक्कम जाहिर झाली आहे. तसेच शहापूर तालुक्यातील वासिंद ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांक मिळाला असून 15 लाख रुपये बक्षिस रक्कम जाहिर झाली आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रोजगार मेळावा संपन्न

**भिवंडी । प्रतिनिधी**


शहरातील भादवड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे नुकताच रोजगार मेळावा संपन्न झाला असून तालुक्यातील बारावी, आयटीआय पदवी पदविका आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले विविध उमेदवारांनी या योजना रोजगार मेळाव्याचा लाभ घेतला आहे. आयटीआय भिवंडी यांच्या पुढाकाराने व जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा घेण्यात आला.या मेळाव्यात गाला इंडस्ट्रीयस वाडा,योक टे क्स्ट ई ल्स , ब्ल ा झ ो टेक्स्टईल्स,एस आई इलेक्ट्रिकल व इतरही कंपन्यानी नोकरीस उत्सुक असलेल्या उमेदवारां करीता जागा उपलब्ध करून देऊन सहभाग घेतला.या रोजगार मेळाव्यास उपस्थित 48 उमेदवारां पैकी 23 उमेदवारांची निवड विविध कंपन्यां कडून करण्यात अली.

## भिवंडी पालिकेच्या बिनतारी संदेश यंत्रणेचा शुभारंभ

**भिवंडी । प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका संगणक विभागअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या बिनतारी संदेश यंत्रणेचा शुभारंभ भिवंडी मनपाचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांचे शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त (संगणक) प्रणाली घोंगे, प्र. सिस्टम मॅनेजर मंदार जोशी, प्र. कार्यालयीन अधिक्षक स्वप्नील गायकवाड तसेच महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते. पालिका क्षेत्रात अस्त्यावश्याक सेवा कार्यरत ठेवण्यासाठी बिनतारी संदेश यंत्रणा गरजेची असून पालिकेची दहा वर्षांपूर्वीची बिनतारी संदेश यंत्रणा त्यासाठी कुचकामी ठरत असल्याने प्रशासनाने बिनतारी संदेश यंत्रणा नादुरुस्त झाल्यास त्याचा महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेवर परिणाम होऊ शकत असल्याने भविष्याचा विचार करुन ही नवी बिनतारी संदेश यंत्रणा सुरू केली आहे.नवीन बिनतारी संदेश यंत्रणा ही पोर्टेबल असून यामध्ये व्हिडिओ कॅमेरा असल्याने आपत्कालीन परिस्थितीत फोटो,व्हिडीओ काढण्या करीता त्याचा वापर होऊ शकतो. तसेच सदर बिनतारी संदेश यंत्रणा (बॉकीटॉकी) हे सिमबेस असल्याने बेसस्टेशन खरेदी करणे अनिवार्य नाही.या वॉकीटॉकीमुळे संपुर्ण भारतामध्ये कुठेही संवाद,संपर्क होऊ शकतो. म्हणून बिनतारी संदेश यंत्रणा ही फायदेशीर ठरणार आहे.अशी माहिती आयुक्त अजय वैद्य यांनी दिली आहे.

## रत्नागिरीत वृद्ध महिलेला कोंडून दागिन्यांवर डल्ला



**रत्नागिरी । प्रतिनिधी**

'खोली भाड्याने मिळेल का?' अशी चौकशी करत वृद्ध महिलेला घरात कोंडून तिच्याकडील दागिन्यांची चोरी केल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी सकाळी घडली. रत्नागिरी शहरातील राधाकृष्ण टॉकिज परिसरात भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. राधाकृष्ण टॉकिजसमोरील दत्त कॅफेच्या पाठीमागील बाजूला ही वृद्ध महिला एकटीच राहते. शुक्रवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घर भाड्याने आहे का? म्हणून एक जोडपे चौकशीसाठी आले होते. काही वेळाने वृद्ध महिला बाजूला गेल्या होत्या. त्यावेळी घराचा दरवाजा उघडाच होता. हीच संधी साधून हे जोडपे घरात शिरले. त्यानंतर वृद्ध महिला घरात येताच त्यांच्या पाठोपाठ एक पुरुष गेला आणि त्याने घरातील पुढील व मागील दोन्ही दरवाजे लावून घेत वृद्धेचे तोंड दाबून सगळे सोन्याचे दागिने काढून घेतले.

## चिपळुणात केरळच्या धर्तीवर मिळणार हाउसबोटची सुविधा

**चिपळूण । प्रतिनिधी**



कोकणातील पर्यटनाला चालना मिळण्यासाठी, तसेच बचत गटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वाशिष्ठी दाभोळ खाडीत हाउसबोटचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. मालदोली प्रभाग संघाच्या महिला हा प्रकल्प राबवणार आहेत. या खाडीत सफर करताना केरळपेक्षाही अप्रतिम निसर्गसौंदर्याची अनुभूती पर्यटकांना घेता येणार आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र प्रथमच रत्नागिरी जिल्ह्यात पाच ठिकाणी हाउसबोट प्रकल्प सुरु होत आहे. त्यामध्ये चिपळूण येथील वाशिष्ठी दाभोळ खाडीचाही समावेश आहे. या खाडीतील जैवविविधता, मगर सफारी, पांडवकालीन लेणी, गरम पाण्याचे कुंड, कांदळवणाची बेटे, नारळी पोफळीच्या बागा या निसर्गरम्य परिसराचा अनुभव या हाउसबोटीतून घेता येईल. एक कोटी खर्चाच्या या हाउसबोटमध्ये दोन वातानुकूलित खोल्या असून, त्यात प्रशस्त बेड, सोफा, बाथरूमची व्यवस्था आहे. हा प्रकल्प सुरळीतपणे चालण्यासाठी सहभागी ३६ महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सर्वसाधारण हाउस बोटिंगमध्ये पर्यटकांसाठी खाद्यपदार्थांची रेलचेल असणार आहे. वर्षाकाठी एक ते दीड कोटींची उलाढाल या प्रकल्पातून अपेक्षित आहे.

## उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात औषधांचा तुटवडा

**उल्हासनगर । प्रतिनिधी**

शासनच्या अनुदाना अभावी मध्यवर्ती रुग्णालयसह जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात औषधांचा ठणठणाट झाला. त्यामुळे रुग्णांवर विना औषध राहण्याची वेळ आली. स्थानिक औषध दुकानदारांनी वाढत्या थकबाकीमुळे औषध देण्यास व ऑक्सिजन, नायट्रेट व स्पिरिट रिफिलास नकार दिल्यास, मोठा अनर्थ ओढविण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राज्यात लाडक्या बहिणी व इतर योजनेवर कोट्यवधींची उधळण सुरु असताना दुसरीकडे औषधीच्या तुटवड्यामुळे गोरगरीब नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाण्याचे प्रमुख डॉ अशोक नांदापुरकर, जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय ठाणे प्रमुख डॉ कैलास पवार यांनी आयुक्त आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई व सहसंचालक आरोग्य सेवा आरोग्य भवन मुंबई विभागाला ठाणे जिल्हातील सर्वच शासकीय रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याची माहिती दिली. सामान्य जिल्हा रुग्णालय ठाणेसाठी १२ कोटी तर उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयासाठी २ कोटी तसेच औषध थकबाकीसाठी ५५ लाखाची मागणी केली. स्थानिक औषध दुकानदाराच्या थकबाकीबाबतची माहिती दिली. मध्यवर्ती रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात दररोज १५०० रुग्णांची नोंद असून आंतररुग्णांची संख्याही क्षमते पेक्षा जास्त आहे. शासनाच्या पूर्णतः मोफत उपचार धोरणामुळे शासकीय रुग्णालयात रुग्ण संख्येत वाढ झाली. मात्र त्याप्रमाणात आरोग्य विभागाकडून औषध पुरवठा होत नसून गेल्या ४ महिन्यापासून स्थानिक औषध खरेदीसाठी अनुदान नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून होणारा औषध पुरवठा ९० टक्के कमी झाला असून मध्यवर्ती रुग्णालयाने स्थानिक दुकानाकडून खरेदी केलेल्या औषधांची थकबाकी ४० लाखावर गेली. त्यामध्ये ९ लाखाचे ऑक्सिजन, नायट्रेस व स्पिरिट फिलींग बिल आहे. दरम्यान दुकानदारांनी थकबाकीसाठी रुग्णालयाकडे तगादा लावला असून दुकानदारांनी थकबाकीचे कारण देऊन, ऑक्सिजन, नायट्रेस, स्पिरिट रिफिल करण्यास मनाई केल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केली. मध्यवर्ती रुग्णालयात औषध तुटवड्यामुळे अनर्थ घडल्यास, त्याला डॉक्टर जबाबदार नाही. याबाबतची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ मनोहर बनसोडे यांनी आमदार कुमार आयलानी यांना दिली. त्यानंतर आयलानी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना रुग्णालयातील परिस्थितीची माहिती देऊन औषध व अनुदानाची मागणी केली.

## अटल सेतूवरील यंत्रणा ITMS प्रणालीसाठी अकार्यक्षम; परिवहन विभागाच्या चाचणीत निष्पन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

अटल सेतूवर इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) कार्यान्वित करण्यासाठी परिवहन विभागाने त्यासंबंधी चाचणी केली. मात्र, 'आयटीएमएस' हे पूर्ण क्षमतेने वापरण्यासाठी उभारलेली यंत्रणा सक्षम नसल्याचे निष्पन्न झाले आहे. परिवहन अधिकाऱ्यांनी तपासणीसाठी त्यांची गाडी अटल सेतूवरून ११० प्रतिकिलोमीटर वेगाने पळवली. पण, तिथे उभारण्यात आलेल्या गँट्रीवरील कॅमेऱ्याने ती नजरबंद केली नसल्याचे त्यांनी सांगितले. अटल सेतूवर अशा तीन गँट्री आहेत. तिथेही हाच अनुभव आल्याचे परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)ने अटल सेतूवर उभारलेली यंत्रणा आयटीएमएस प्रणालीसाठी तयार आहे. आरटीओने तिची तपासणी करून ती अतिवेगाने प्रवास करणाऱ्या वाहनांवर, अवैध फास्ट टॅगवर कारवाई करण्यासाठी सज्ज असल्याचे प्रमाणित करावे, असे पत्र मुंबई 'एमएमआरडीए'ने तीन महिने आधी पाठविले होते. त्याची पूर्तता करण्यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांनी बुधवारी या यंत्रणेची तपासणी करून काही चाचण्या घेतल्या. त्यात ही यंत्रणा 'आयटीएमएस'साठी सक्षम नाही. अटल सेतूवरील यंत्रणा ही ओव्हर स्पीड करणाऱ्या वाहनांचा वेगसुद्धा मोजू शकत नसल्याने ती चलन जारी करण्यासाठी सक्षम नसल्याचे आढळले.



'आयटीएमएस' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा आहे. तिच्या माध्यमातून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ प्रकारच्या गुन्ह्यांची स्वयंचलितपणे नोंद करणे अपेक्षित आहे. परंतु, अटल सेतूवर असलेल्या यंत्रणेद्वारे फक्त नो पार्किंग, चुकीच्या दिशेने वाहतूक करणे आणि फास्ट टॅग वैध नसणे अशा मोजक्या गुन्ह्यांवर कारवाई केली जात आहे.

# जागरुकता पाळा-पैसे सांभाळा...!

**रेखा केळकर**

फसवणूक बहुतेक वेळा अनोळखी, बिन चेहऱ्याच्या माणसांकडून किंवा काही वेळा एखाद्या ओळखीच्या, भरवशाच्या माणसाकडूनही होऊ शकते. श्री. व सौ. गंगोपाध्याय हे हैदराबाद येथे राहणारे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग आणि मुदत ठेव खाते होते. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सौ. गंगोपाध्याय ह्यांनी १५ लाखांच्या २ आणि १० लाखांची १ अशा ४० लाखांच्या मुदत ठेवी SBI हैदराबाद शाखेत उघडल्या. श्री. गंगोपाध्याय ह्यांनी जवळ जवळ २ वर्षांनी, ४ एप्रिल २०१९ ला बँकेकडून नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ चे अकाउंट स्टेटमेंट घेतले. ते वाचून त्यांना जबरदस्त धक्का बसला कारण अकाउंटमध्ये २८ लाखांऐवजी ३ लाख रुपयेच शिल्लक होते. त्यांना असेही आढळले की हे पैसे इंटरनेट बँकिंगमार्फत वळवले गेले होते. पण आश्चर्य म्हणजे त्यांनी इंटरनेट सेवा मागितली नव्हती. त्यांनी VIEW ONLY सेवा मागितली होती. मग हे कसे घडले असेल बरे ह्या विचारात ते पडले. नंतर लक्षात आले की, एका ओळखीच्या, विश्वासातल्या माणसाकडून त्यांची मोठी फसवणूक झाली होती. त्यांनी ५ दिवसांनी पोलिसात तक्रार केली आणि लगेच बँकेच्या शाखेत तक्रार केली. त्यांनी




बँकेच्या असे निदर्शनात आणून दिले की ४० लाखांच्या ठेवी मुदत संपण्या अगोदर बंद करून सेव्हिंग खात्यात पैसे जमा केले गेले आणि या पैशातील फक्त ३ लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. ह्यावर बँकेने असे सांगितले की, सौ. गंगोपाध्याय ह्यांच्या अकाऊंटची इंटरनेट बँकिंग सेवा अनधितकृतपणे वापरली गेली असण्याची शक्यता दिसते. इथे असे नमूद करावेसे वाटते की त्यांचे बँकेचे सर्व व्यवहार त्यांचा ड्रायव्हर करीत असे.

बँकेने काहीच मदत न केल्याने गंगोपाध्याय ह्यांनी राज्य आयोगाकडे तक्रार केली. नुकसानभरपाई म्हणून ६३ लाख, वार्षिक व्याज, मानसिक त्रासाबद्दल २५ लाख आणि कोर्टकचेरीच्या खर्चाबद्दल २० हजार रुपये मागितले. तक्रारीत त्यांनी ह्या गोष्टीवर भर दिला की खातेदार ज्येष्ठ नागरिक आहेत आणि TECH SAVVY नाहीत म्हणून सावधगिरीचा उपाय म्हणून त्यांनी view only पर्याय निवडला होता. बँकेने निष्काळजीपणे खातेदाराकडे चौकशी न करता view only पर्याय बदलून पैशाचे व्यवहार करण्याची परवानगी दिली. त्यामुळे ह्या नुकसानाला बँकच जबाबदार आहे. ह्यावर बँकेने सांगितले की खातेदाराने आपला मोबाईल, PIN नंबर, पासवर्ड आणि इतर माहिती ड्रायव्हरसारख्या जवळच्या माणसाला देणे हे चुकीचेच आहे. बँकेने पुढे असेही म्हटले की, हे सर्व ३७ वेळा केले गेलेले व्यवहार एकतर खातेदाराच्या संमतीने झालेले आहेत किंवा खातेदाराच्या निष्काळजीपणामुळे झालेले आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून राज्य आयोगाने गंगोपाध्याय ह्यांच्या बाजूने निर्णय दिला. आयोगाने स्टेट बँकेला असेही सांगितले की, ते ६३ लाखांच्या वसुलीसाठी ते फौजदारी न्यायालयात दावा दाखल करू शकतात. ह्यावर स्टेट बँकेने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे वरील निर्णयाविरुद्ध अपील केले. त्यांनी असा युक्तिवाद केला की फसवणुकीच्या तक्रारी ह्या ग्राहक आयोगाकडे न करता दिवाणी न्यायालयात करायला हव्या होत्या. सायबर क्राइम आणि बँकिंग लोकपाल ह्यांनी गंगोपाध्याय ह्यांची तक्रार फेटाळून लावली होती याकडेही लक्ष वेधले. दुसरे असे की RBI च्या परिपत्रकानुसार ग्राहकाच्या निष्काळजीपणामुळे गेलेले पैसे वसूल करण्याची जबाबदारी बँकेची नाही. ह्यावर गंगोपाध्याय ह्यांच्या वकिलाने असे प्रतिपादन केलं की ह्या घटनेनंतर बँकेने इंटरनेट बँकिंगच्या प्रणालीत सुधारणा केली. फोनवरून कुठलाही बदल न करता खातेदाराने बँकेत प्रत्यक्ष येणे बंधनकारक केलं. ह्यावरून हे सिद्ध होते की, बँकेच्या प्रणालीत त्रुटी होत्या. हे सगळे ऐकून घेतल्यावर राष्ट्रीय आयोगाने असे म्हट्ले की, प्रणालीतल्या त्रुटींमुळेच त्यांचा ड्रायव्हर केवळ मोबाईल नंबर आणि अकाउंट नंबर एव्हढ्याच माहितीच्या आधारे 'VIEW ONLY' पर्याया वरून पैसे काढण्याच्या परवानगी वर बदल करू शकला. सर्व गोष्टींचा विचार करून राष्ट्रीय आयोगाने स्टेट बँकेचे अपील फेटाळून लावले आणि राज्य आयोगाचा निर्णय कायम ठेवून गंगोपाध्याय ह्यांना नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला.

वरील केसमध्ये खातेदाराला नुकसानभरपाई मिळाली असा निर्णय झाला असला तरीही ग्राहक म्हणून आपण बँकेचे व्यवहार शक्यतो स्वतःच करावे, वेळोवेळी पासबुक अपडेट करावे, इंटरनेट बँकिंग सेवा घेतली असेल, तर अनोळखी फोन घेऊ नये, कुठलीही अनोळखी लिंक उघडू नये, ती असुरक्षित, फसवी असू शकते. आपला PIN/ CVV/ PASSWORD/ OTP कोणालाही सांगू नये. खूप जास्त व्याज किंवा फायदा देऊ असे दाखविणाऱ्या भूलपाडू जाहिरातींना बळी पडू नये. एकच संदेश लक्षात ठेवावा 'जागरुकता पाळा-पैसे सांभाळा'.

# ई-व्हिसाची प्रक्रिया सुलभ

**विनिता शाह**

केंद्र सरकारने देशात निर्गुंतवणुकीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या चिनी तंत्रज्ञांच्या व्हिसा मंजुरीची प्रक्रिया सुलभ आणि तर्कसंगत करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थातच, हा निर्णय स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे किचकटपणा कमी होईल आणि त्यात वेग येण्यास मदत येईल, अशी अपेक्षा केली जात आहे. विशेषतः 'पीएलआय'शी संबंधित असलेल्या उद्योगांसाठी केंद्राने पुढाकार घेतला आहे. ऑगस्ट महिन्यात लागू होत असलेल्या नव्या निकषानुसार कोणत्याही कंपनीने अर्ज दिल्यानंतर तो मंजुरीसाठी संबंधित सरकारी खात्याकडे पाठविला जाईल. गृह मंत्रालयाकडे 28 दिवसांच्या आत अर्ज पाठवावा लागेल. यानुसार या प्रक्रियेला दीड महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे आणि व्यावसायिकांचा ई-व्हिसा सहा महिन्यांपर्यंत वैध राहील. अनेक व्यावसायिकांच्या मते, व्हिसासंबंधीची प्रकरणे ही त्यांची उत्पादने आणि उत्पादकतेवर परिणाम करत आहेत. त्यामुळे सरकारचा निर्णय अशा प्रकारचा परिणामाचा प्रभाव कमी करेल, अशी अपेक्षा आहे. तसेच 'पीएलआय'अंतर्गत योजनेत सामील नसलेल्या कंपन्यांनादेखील व्हिसा जारी करणे गरजेचे आहे. सरकारने व्हिसाची समस्या दूर केली असली, तरी सर्वात मोठा चर्चेचा मुद्दा चीनची गुंतवणूक हा आहे. विशेषतः, नव्या आर्थिक आढावा बैठकीत मांडलेल्या मतांसंदर्भात आहे. कारण, जागतिक पुरवठा साखळीत चीन मजबूत स्थितीत आहे. त्यामुळे भारताला स्वतंत्ररूपाने या नेटवर्कचा भाग होणे सध्या तरी अशक्य दिसत आहे.

# 'कृषी शिक्षण' क्षेत्रातील वास्तविकता!







**योगेश भानुदास पाटील**

आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये कृषी क्षेत्रासाठी 1 लाख, 32 हजार, 470 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम एकूण अर्थसंकल्पाच्या 2.7 टक्के टक्के असून मागच्या वर्षीपेक्षा 5 टक्क्यांनी अधिक आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयांतर्गत प्रामुख्यानं दोन विभाग येतात; कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग' आणि कृषी संशोधन आणि शिक्षण विभाग'. या वर्षीच्या तरतुदीपैकी सुमारे 92 टक्के खर्च हा पहिल्या विभागावर होणार आहे तर कृषी शिक्षण आणि संशोधनासाठी उर्वरित 8 टक्के रक्कम खर्च होणार आहे. बदलत्या हवामानात तग धरू शकणाऱ्या वाणांची निर्मिती, रोगप्रतिकारक्षम आणि निरोगी वाणे, दर्जेदार बीज उत्पादन, वाढत्या लोकसंख्येची खळगी भरण्यासाठी एकरी उत्पादकतेत वाढ, डाळवर्गीय पिकांमध्ये प्रकाशास असंवेदनशील वाणांची निर्मिती करणे अशा अनेक बाबींवर या 8 टक्के रकमेतून खर्च होणे अपेक्षित आहे आणि मग काही रक्कम शिल्लक राहिलीच तर कृषी शिक्षणाची गंगा चालू ठेवू, असं सगळं चित्र यातून दिसतंय.

कृषी शिक्षणाबाबतीत केंद्र सरकार असेल, वा राज्यसरकार हे किती दक्ष आहे, याची आपल्याला चांगलीच जाणीव आहे. मागच्या दोन वर्षांपासून कृषी क्षेत्रात आचार्य पदवीचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी फेलोशिप जवळ जवळ बंद झाल्यात जमा आहे. या बाबींवर प्रकाश टाकताना दस्तरखुद राज्याचे उपमुख्यमंत्री विधान करतात की पीएच. डी करून हे विद्यार्थी कोणते दिवे लावणार आहेत?' यावरून राज्यकर्त्यांची कृषी शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि संशोधन कार्याची जबाबदारी खांद्यावर असलेल्या कृषी विद्यापीठांबाबत काय मानसिकता आहे, हे वेगळं सांगायला नको. कृषी क्षेत्राविषयी शासनदरबारी असलेली ही उदासीनता आता विद्यार्थ्यांमध्येही झळकू लागली आहे. या वर्षीच्या बीएस.सी ॲग्री प्रवेशाची स्थिती पाहिली तर प्रवेश अर्ज भरण्याची तारीख तब्बल 3 वेळेस वाढवून देण्यात आली. साधारण 5-6 वर्षांपूर्वी कृषी पदवीला प्रवेश मिळणे म्हणजे खूप काही मिळवल्याची भावना पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये होती. एमबीबीएस नंतर विद्यार्थ्यांची सर्वात जास्त पसंती ही कृषी पदवीला होती. व्यवस्थापन कोटा काही लाख रुपयांमध्ये मोजला जात होता. आज मात्र चित्र पूर्णतः पालटलेलं दिसून येते. खाजगी संस्थांवरील शिक्षकांना कधी नव्हे तेवढा प्रचार करावा लागत आहे. कृषी एमपीएससीची पदभरती कोर्टात अडकल्यापासून बी. टेक. कृषी या चार वर्षांच्या पदवीकडे तर विद्यार्थी आणि पालकांनी सपशेल पाठ फिरवल्याचे चित्र आहे. खूप साऱ्या जागा खाली राहण्याची भीती आहे. तद्वतचं उद्यानविद्या महाविद्यालयातील प्रवेशालाही थंड प्रतिसाद आहे. सध्याच्या घडीला महाराष्ट्रात 174 कृषी महाविद्यालये (खाजगी आणि सरकारी) असून जवळ जवळ 18000 विद्यार्थी क्षमता आहे. या जागांचेच भवितव्य अधांतरी असताना अलीकडेच भोकरदन आणि बार्शी या दोन कायमस्वरूपी विनाअनुदानित कृषी महाविद्यालयांना राज्यशासनाने मान्यता दिली आहे. मागील वर्षीच बुलढाण्याला शासकीय कृषिमहाविद्यालय सुरु करण्यात आले आहे. राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये जवळ जवळ 55 टक्के पद रिक्त आहेत. त्यात नवीन कॉलेज! भविष्यात जागा भरल्याही जातील परंतु मध्यंतरी जी तीनशे-चारशे विद्यार्थी पदव्या घेऊन बाहेर पडतील त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाची पातळी किती समृद्ध असेल? व्यवस्थेअभावी ज्ञानासोबत केलेल्या तडजोडीमुळे त्यांचे आणि शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही का?

कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची दशा

कृषी पदवीला प्रवेश घेतल्यानंतर पहिल्या सहामाही सत्रासाठी जवळ जवळ 12-13 विषय असतात. हे विषय गणित,जीवशास्त्र, रसायनशास्त्र अशा पारंपरिक विषयांपेक्षा पूर्णतः भिन्न असतात. कृषिशास्त्र,मृदाविज्ञान,किटकशास्त्र, कृषी हवामानशास्त्र, इ. त्यामुळे या विषयांची पासिंग काढण्यातच विद्यार्थी पार गुरफटून जातात. त्याशिवाय विषयात नापास झाल्यास पुन्हा 1 संधी मिळते. अन्यथा 1 वर्ष शिल्लक मोजावे लागते. शासकिय कृषी महाविद्यालये असो वा खाजगी, एकूण शिक्षण प्रक्रियेचा दर्जा आजच्या कृषी क्षेत्रातील आव्हानांशी सामना करण्यासाठी पुरेसा नाही हे दिसून येते. चार वर्षाच्या पदवी शिक्षणाच्या अंतिम वर्षात जेव्हा आम्ही विद्यार्थी शेतकऱ्याच्या बांधावर पोहचतो तेव्हा ती फक्त फोटो काढण्यापूरती तजवीज असते. विद्यार्थ्यांचे तोडकेमोडके ज्ञान पाहून शेतकरी त्यांना आपल्या बांधावर उभं करून वेळ घालवण्यात अजिबात उत्सुक नसतो. 100 मधल्या 95 वेळा असंच होते. बंदी होऊन दहा वर्षे झालेली कीटकनाशकेही पोरं घोकंपट्टी करून पाठ करतात आणि परीक्षेत लिहून येतात. सुटीत घरी आल्यावर जर चुकून एखाद्या शेतकऱ्याची भेट झाली आणि त्याने पिकासंबंधी काही माहिती विचारली तर हा विद्यार्थी चाचपडतो. घरची पार्श्वभूमी शेतीची असेल तर ठीक, नाहीतर बरेच बरे आहे.

कमतरता कुठे राहते?

ज्याप्रमाणे प्राथमिक,माध्यमिक शिक्षकांचे नियमित अंतराने प्रशिक्षण होते, त्याच प्रमाणे कृषी महाविद्यालयांच्या शिक्षकांचेही नियमित प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. शेती क्षेत्राची आव्हाने दररोज बदलत आहे. अनेक स्टार्टअप आपले नवनवीन तंत्रज्ञान बाजारात आणत आहेत. जागतिक पातळीवर नवीन संशोधन होत आहे. या सर्व घडामोडी आणि शोधांबाबतीत वेळोवेळी हा शिक्षक वर्ग प्रशिक्षित झाला पाहिजे. तेव्हाच ते विद्यार्थ्यांना अद्ययावत व काळाशी सुसंगत ज्ञान पोहचवू शकतात. हेच ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न झाला तर शेतकरी वर्ग उत्सुकतेने ते ज्ञान ग्रहण करेल. आज कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये प्रात्यक्षिक ज्ञान येणे अत्यंत गरजेचे आहे.

'संसाधनांची कमतरता' हा कृषी शिक्षणाच्या सुमार दर्जास कारणीभूत असलेला एक महत्त्वाचा घटक आहे. हेच कारण आहे की केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या रँकिंग मध्ये पहिल्या चाळीस कृषी विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील एकही कृषी विद्यापीठ नाही ! फक्त शासन मान्यता देण्याची घाई करून इतर महत्वाच्या बाबींकडे डोळेझाक केली जाते. आजही काही ठिकाणी तपासणीसाठी डीन कमिटी येणार म्हणून 8 दिवस आधी प्रयोगशाळेतील साहित्य भाडेतत्त्वावर आणले जाते. असं असेल तर आजचा विद्यार्थी स्वतःला व शेतकऱ्यांना समृद्ध करण्यात किती योगदान देऊ शकेल?

अपेक्षित बदल

शिक्षकांचे नियमित प्रशिक्षण, विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके प्रत्यक्षात करून घेणे व तशी पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, संदर्भ पुस्तकांत अद्ययावत बदल करणे, संशोधक शास्त्रज्ञ व विद्यार्थी यांच्यात संवाद कार्यक्रमांचे आयोजन करणे, कृषी क्षेत्रात असणाऱ्या कंपन्यांना कोणत्या प्रकारचे मनुष्यबळ आवश्यक असते त्याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक ती कौशल्य विकसित करणे, अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी परिसर मुलाखती आयोजित करणे, पायाभूत सुविधांची उभारणी करणे, विविध स्टार्टअप उद्योगांना भेटी, व्यवसायाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन अशा एक ना अनेक कृतिशील उपक्रमांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. कृषी शिक्षणाची व्यवहार्यता वृद्धिंगत करण्यासाठी, शेतीमातीच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी व त्या कामी विद्यार्थ्यांची प्रशिक्षित फौज निर्माण करण्यासाठी कृषी शिक्षण क्षेत्रात काळाभिमुख बदलांची शृंखला आवश्यक आहे.

# रशिया, निर्बंध आणि इंधनाचे दर

**संजीव ओक**

युक्रेनवर रशियाने आक्रमण केल्यानंतर जगभरातील प्रमुख राष्ट्रांनी रशियावर निर्बंध लागू केले. विशेषतः जी-7 समूहाने रशियाची कोंडी करण्यासाठी पुढाकार घेतला. तथापि, भारताने आंतरराष्ट्रीय निर्बंधांचा विचार न करता रशियाकडून सवलतीच्या दरातील तेल खरेदी सुरु ठेवली. त्याचा परिणाम म्हणून आज देशांतर्गत बाजारपेठेत इंधनाचे दर कमी होतील, असे संकेत मिळत आहेत.


भारत सरकारने रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी करण्याच्या निर्णयाला दुजोरा दिला आहे. सध्या सुरु असलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने हा निर्णय घेतला आहे, हे विशेष. विशेषतः रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणानंतर अनेक पाश्चात्त्य राष्ट्रांनी रशियन तेलावर निर्बंध लादले आहेत. कच्च्या तेलाचा एक मोठा ग्राहक म्हणून केंद्र सरकारचे उद्दिष्ट रशियन स्रोतांकडून कमी किमतीत कच्चे तेल खरेदी करून देशाची ऊर्जा गरज पूर्ण करणे, हे आहे. ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारचे हे प्रयत्न आहेत. देश आपली वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. रशियाकडून सवलतीच्या दरात तेल मिळवून भारत ऊर्जा खर्चात बचत करु शकतो. देशाच्या आर्थिक स्थिरतेसाठी तसेच विकासासाठी ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारताने रशियाकडून केलेली ऊर्जा खरेदी ही राष्ट्रीय हितसंबंधांनुसार असून ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणण्यावर भर देणारी आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या टीकेला सामोरे जावे लागत असतानाही भारताने असे म्हटले आहे की, देशांतर्गत ऊर्जापुरवठा सुरळीत राखण्यासाठी तसेच आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी रशियाकडून सवलतीच्या दरात तेल आयात करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने यावर जोर दिला आहे की, भारताचे ऊर्जा धोरण बाह्य दबावांऐवजी लोकसंख्येच्या आणि अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार मार्गदर्शन करते. तेलासाठी भारताची रशियाशी संलग्नता, आंतरराष्ट्रीय संबंधांसह आर्थिक गरजा संतुलित करून, जागतिक परिदृश्यात ऊर्जा खरेदीसाठी व्यावहारिक दृष्टिकोन दर्शवणारी आहे. हा निर्णय भौगोलिक-राजकीय आव्हानांवर मार्गक्रमण करताना परवडणारी ऊर्जा सुरक्षित करण्यावर भारताचा धोरणात्मक भर दर्शवतो.

त्याचवेळी जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या आहेत. या घसरणीला अनेक घटक कारणीभूत आहेत. यामध्ये मागणी आणि पुरवठ्यातील बदल, मंदावलेली वाढ किंवा कमी ऊर्जा वापर सूचित करणारा आर्थिक डेटा आणि व्यापारावर विपरीत परिणाम करणाऱ्या भू-राजकीय घडामोडींचा समावेश आहे. अमेरिका आणि ओपेक राष्ट्रांसारख्या प्रमुख उत्पादकांकडून वाढलेल्या तेल उत्पादनामुळे मागणीपेक्षा जास्त पुरवठा होत असल्याने तेलाच्या किमतीत आणखी घसरण होऊ शकते. याव्यतिरिक्त प्रमुख बाजारपेठांतील विशेषतः चीनमध्ये आर्थिक मंदीच्या चिंतेमुळे भविष्यातील तेलाच्या वापराचे अंदाज कमी होऊ शकतात. त्यामुळे किंमत घसरण्यास हातभार लागला आहे. कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्याने जगभरातील अर्थव्यवस्थेवर विविध परिणाम होऊ शकतात. तेल आयात करणाऱ्या देशांसाठी यामुळे इंधन खर्च कमी होऊ शकतो आणि महागाईत घट होऊ शकते. याउलट तेल निर्यात करणाऱ्या राष्ट्रांसाठी ही चिंतेची बाब आहे. या देशांचे अर्थकारण त्यामुळे कोलमडून पडणार आहे. त्यांचा महसूल आणि आर्थिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होत आहे. घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किमती जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा बाजारातील व्यापक कल दर्शवत आहेत. ज्याचा ग्राहक आणि उत्पादक दोघांवरही थेट प्रभाव पडताना दिसून येतो.

युक्रेन-रशिया युद्धाला तोंड फुटल्यानंतर, पाश्चात्त्य राष्ट्रांनी विशेषतः जी-7 समूहाने रशियाच्या तेलाच्या किमतीवर निर्बंध लागू केले. रशियन तेलाच्या किमतीवर जी-7 राष्ट्रांनी जी किमान मर्यादा लागू केली होती, त्याचा भारताच्या आयातीवर परिणाम होत आहे. भारताला रशियन तेलाच्या कमी किमतीचा फायदा होतो. यामुळे भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांच्या खर्चात लक्षणीय बचत होत आहे. त्यामुळे त्यांना अधिक स्पर्धात्मक दराने कच्च्या तेलाची खरेदी करता येईल. रशियन तेलाचा एक प्रमुख आयातदार म्हणून आयात खर्च कमी करताना भारत आपली ऊर्जा सुरक्षा वाढवण्यासाठी या किमतीतील घसरणीचा फायदा घेऊ शकतो. युक्रेन युद्ध सुरु झाल्यापासून भारताने रशियन तेलाच्या आयातीत लक्षणीय वाढ केली आहे. कमी किमतीमुळे भारतीय तेल कंपन्या रशियाकडून त्यांची खरेदी वाढवत आहेत. रशियन तेलाचा सर्वात मोठ्या खरेदीदारांपैकी एक म्हणून भारत आज ओळखला जात आहे. रशियाकडून तेल खरेदी करत भारताने ऊर्जा स्रोतांमध्ये विविधीकरणाची गरजही अधोरेखित केली आहे.

# हरित वायू इंधनाचे स्वागत करु या!

**आनंद कुमार झा**




कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाची परिस्थिती विकसित करण्याकरिता आपले केंद्र सरकार अनेक मोठी पावले उचलत आहे. इतकेच नाही तर या क्षेत्रातून दरवर्षी १५ दशलक्ष मेट्रिक टन एमएमटी कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाचे उत्पादन घेण्याचे उद्दिष्टही आपल्या सरकारने समोर ठेवले आहे. केंद्र सरकारने हा उपक्रम प्रामुख्याने सुरु केला तो जीवाश्म इंधनावर आधारित वाहतूक व्यवस्थेला ठोस शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी. मात्र असे असले तरी कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाच्या पलीकडे मिळणारे अतिरिक्त लाभ आत्ताच दिसू लागले. इथे एक बाब समजून घ्यायला हवी ती म्हणजे आपल्या देशाने निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाची स्थिती गाठण्याचे जे महत्वाकांक्षी ध्येय समोर ठेवले आहे, ते पूर्ण करण्यात स्वतःचा महत्त्वाचा वाटा देण्याची क्षमता कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनात आहे. १५ दशलक्ष मेट्रिक टन इतक्या नैसर्गिक वायू इंधन २०३० सालापर्यंत शहरी वायू इंधन वितरण व्यवस्थेअंतर्गत सीएनजी (टी)/पीएनजी (डी) या श्रेणीत, देशांतर्गत वापर होत असलेल्या नैसर्गिक वायू इंधनाची जागा अगदी सहजतेने घेणार आहे, इतकी याची क्षमता अफाट आहे. या इंधनाचा आणखी एक लाभ म्हणजे जैव वायू इंधन उत्पादन प्रकल्पांमध्ये आंबणकृत सेंद्रिय खताचे अर्थात फोमचे उपउत्पादनही आपल्याला मिळते. याच फोमचा जर का आपण खत म्हणून वापर केला तर त्यामुळे जमिनीतल्या कार्बनच्या कमतरतेची कसर भरून काढता येऊ शकते. यालाच जोडलेली दुसरी गोष्ट फोमच्या वापरामुळे जमिनीतील कार्बनचे प्रमाण वाढल्याने आपसूकच जमिनीतील नायट्रोजन आणि फॉस्फरसचे प्रमाणही वाढणार असल्याने, हेच फोम काही अंशी रायसायनिक खतांसाठी देखील पर्याय ठरु शकते.


या क्षेत्राने आता केंद्रस्थानी असलेले महत्त्वाचे क्षेत्र म्हणून स्थान मिळवले आहे. त्यामुळेच तर पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देखील जैवभार अर्थात बायोमासच्या खरेदीकरता, जैवभार एकजीवीकरण यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी आर्थिक सहाय्य, जैव वायू इंधन प्रकल्प आणि शहरी वायू इंधन वितरण व्यवस्थेत इंधन वाहून नेणाऱ्या वाहिका जोडणी व्यवस्था उभारण्याकरिता आर्थिक सहाय्याच्या योजना तसेच शहरी वायू इंधन वितरणात जैव वायू इंधनाचे मिश्रित इंधन वितरण बंधनकारक करणारी तरतूद अशा प्रकारच्या योजना आणि उपाययोजनांची आखणीही केली आहे. या क्षेत्रातून मिळू शकणाऱ्या महसुलाचे जे सर्व मार्ग आहेत, ते खरेतर अद्यापही पूर्ण क्षमतेने वाटचाल करु लागलेले नाहीत हे देखील सध्याचे वास्तव आहेच. त्यामुळेच तर अद्यापही या क्षेत्रातून मिळणारे प्रमुख उपउत्पादन असलेल्या फोममधून मिळू शकणारा महसूलही आपल्याला अद्यापपर्यंत पूर्ण क्षमतेने मिळवता आलेला नाही. दुसरीकडे अद्यापही कार्बन पतगुणांकण यंत्रणाही पूर्णपणे स्थापित झालेली नाही. यामुळे कार्बन पतगुणांकनाची निर्मिती आणि चलनीकरणाबाबतही काहीएक प्रमाणात अद्यापही अनिश्चितता निर्माण झाली असल्याची बाबही आपल्याला स्वीकारावी लागेल. आपण जर का उपलब्ध सर्व महसुली स्त्रोतांचे चलनीकरण करु शकलो नाही, तर त्यामुळे पतपुरवठा उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणांच्या दृष्टीने काही एका प्रमाणात जोखीम निर्माण होते आणि याचा अप्रत्यक्ष परिणाम या क्षेत्राच्या प्रगतीवर होतो.

अर्थात यामुळे जैव वायू इंधन प्रकल्प व्यवहार्य करणे आणि या संपूर्ण क्षेत्राचा विस्तार करणेही तसे आव्हानात्मक काम झाले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आपल्या सरकारने जैव वायू इंधनाची उचल सुनिश्चित करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे वायू इंधनाच्या एकूण विक्रीत मोठी वाढ झाली आहे. ही बाब समजून घेण्यासाठी आपण काही आकडेवारी पाहू या. २०२२-२३ या आर्थिक वर्षात वायू इंधनाची विक्री सुमारे १२,००० टन इतकी होती, त्यात आर्थिक वर्ष २०२३ -२४ मध्ये मोठी वाढ होऊन ती १९,००० टनांवर पोहोचली आहे. आता चालू म्हणजेच २०२४-२५ या आर्थिक वर्षातल्या दोन महिन्यांच्या उचलीची आकडेवारी पाहिली तर त्यातून हे सहज लक्षात येते की या आर्थिक वर्षात जैव वायू इंधनाची उचल ही दुपटीपेक्षा जास्त असणार आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊनच सरकारने स्वतःहून पुढाकार घेत, जैव वायू इंधन प्रकल्प आणि शहरी वायू इंधन वितरणव्यवस्थेत इंधन वाहून नेणाऱ्या वाहिका जोडणी व्यवस्था उभारण्याकरिता पाठबळ देण्यासाठीच्या योजना आणल्या आहेत.

आपल्या केंद्र सरकारने खत विपण्यांकरिता फोमच्या विक्रीसाठी बाजारपेठा विकसित करण्याकरिता पाठबळ देण्याच्या योजनेची घोषणा केली आहे. पण अजूनही या योजनेला म्हणावे तसे यश मिळालेले नाही. याचे कारण फोमची साठवणूक करणे आणि त्याची वाहतूक करणे थोडे जिकिरीचे ठरले आहे. या सगळ्याला जोडून आणखी एक महत्त्वाचे कारणही यामागे आहे, ते म्हणजे फोमसारखा कार्बनचा समृद्ध स्त्रोत आपल्या शेतात वापरण्याबाबत शेतकऱ्यांमध्येच फारसा उत्साह दिसून येत नाही. खरेतर आपल्या देशातल्या विशेषतः हरयाणा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि राजस्थान यांसारख्या देशाच्या उत्तरेकडच्या राज्यांमधल्या जमिनींमधले कार्बनचे प्रमाण अत्यंत अत्यल्प पातळीवर आहे. कार्बनच्या या कमतरतेमुळे जमिनीची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने आपण जमिनीला रासायनिक खतांच्या माध्यमातून जो नायट्रोजन आणि फॉस्फरसचा पुरवठा करतो, त्याचा पूर्ण क्षमतेने वापर करण्याच्या जमिनीच्या क्षमतेवरही विपरीत परिणाम होतो. जमिनीतील कार्बनचे प्रमाण वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांनाही या प्रयत्नांमध्ये भागीदार करून घेणेही गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर जर का सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीला पुरवलेल्या प्रत्येक टन सेंद्रिय कार्बनच्या वापरासाठी प्रोत्साहनपर लाभ दिले तर, त्यामुळे फोम सारखे उपउत्पादन पुरेपूर क्षमतेने घेऊन त्याचा प्रभावी वापर करून घेण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात मोठी मदत होऊ शकते. आपल्या सरकारने निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता खत उत्पादक कंपन्यांना शेतकऱ्यांना मिश्रित खतांचीच विक्री करणे अनिवार्य केले आहे. आता वायू इंधनाचा विचार केला तर त्यासाठी सरकारने शहरी वायू इंधन वितरण व्यवस्थेच्या भागधारकांना मिश्रित वायू इंधनाचा पुरवठा करणे बंधनकारक केले. जागतिक जैव इंधन आघाडीची वाटचालही पुढे जावी याकरिता आपल्या सरकारने इतर भारत भागीदार देशांसोबत काम करणे सुरु ठेवले आहे. दुसरीकडे जैव वायू इंधन हे प्रत्यक्षात सध्याच्या इंधन उद्योग क्षेत्राच्या परिसरांमध्येच उपलब्ध असल्याने, एलएनजी / आरएलएनजीच्या तुलनेत त्याच्या वाहतुकीचा खर्च देखील खूपच कमी असणार आहे.

# कुठल्या दिशेने निघालो आहोत आपण...

विश्वनाथ गरुड




पोलिसांकडून स्वसंरक्षणार्थ त्यांच्या कोठडीत असतानाच बदलापूरच्या शाळेतील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्यावर गोळीबार केला जातो आणि त्यामध्ये त्याचा मृत्यू होतो. हे वरवर जरी न्याय झाला, या पठडीत बसणारे वाटत असले तरी ते तसे नक्कीच नाही. कारण न्याय कोण देणार याची एक व्यवस्था देश म्हणून आपण स्वीकारली आहे. जर त्या व्यवस्थेला वगळून कोणीही उठून आपण न्याय दिला, असे म्हणू लागला आणि समाजातील मोठा वर्ग हाच न्याय बरोबर असल्याचे सांगत त्याचे स्वागत करू लागला तर निश्चितच प्रश्न पडायला हवा की कुठल्या दिशेने निघालो आहोत आपण.

काही घटना अस्वस्थ करतात. त्यातही जर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने बघण्याची सवय असेल, तर अशा वेळी जास्तच अस्वस्थ व्हायला होते. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा पोलिसांनी केलेला एन्काऊंटर हा त्यापैकीच एक. हा विषय खूपच संवेदनशील आहे. अक्षयवर जे आरोप झाले ते गंभीर होते.

त्यात तो दोषी आढळला असता, तर न्यायालयाने त्याला शिक्षा ठोठावली असतीच, पण हे सगळे घडताना काही एक प्रक्रिया पार पडली असती आणि मग शिक्षा सुनावली गेली असती, पण या सर्व प्रक्रियेमध्ये न जाताच पोलिसांकडून स्वसंरक्षणार्थ त्यांच्या कोठडीत असतानाच आरोपीवर गोळीबार केला जातो आणि त्यामध्ये त्याचा मृत्यू होतो.

हे वरवर जरी न्याय झाला, या पठडीत बसणारे वाटत असेल, तरी ते तसे नक्कीच नाही. कारण न्याय कोण देणार याची एक व्यवस्था देश म्हणून आपण स्वीकारली आहे. जर त्या व्यवस्थेला वगळून कोणीही उठून आपण न्याय दिला, असे म्हणू लागला आणि समाजातील मोठा वर्ग हाच न्याय बरोबर असल्याचे सांगत त्याचे स्वागत करू लागला तर निश्चितच प्रश्न पडायला हवा की कुठल्या दिशेने निघालो आहोत आपण.

अक्षय शिंदे प्रकरणात पोलिसांकडून स्वसंरक्षणार्थ गोळीबार केल्याचा युक्तिवाद केला जातो. नव्याने देशात अमलात आलेल्या भारतीय न्याय संहितेत आणि आधीच्या भारतीय दंड संहितेत स्वसंरक्षण करण्याची तरतूद नक्कीच आहे, पण त्यामध्ये एक महत्त्वाचे कलम आहे. ते समजून घेतले पाहिजे. भारतीय न्याय संहितेतील कलम 37 मध्ये दुसऱ्या भागात असे म्हटले आहे की, The right of private defence in no case extends to the inflicting of more harm than it is necessary to inflict for the purpose of defence.

याचा अर्थ इतकाच आहे की स्वसंरक्षणाच्या नावाखाली तुम्ही गरजेपेक्षा जास्त मोठा प्रतिहल्ला समोरच्या व्यक्तीवर करू शकत नाही. केवळ स्वतःचे संरक्षण करण्यासाठी जेवढा प्रतिहल्ला करणे अपेक्षित आहे, तितकाच तुम्ही केला पाहिजे.

याच प्रकरणात

मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर बुधवारी झालेल्या सुनावणीवेळी न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते खूप महत्त्वाचे आहेत. अक्षय शिंदेच्या डोक्याला गोळी कशी लागली, अशा प्रश्न उच्च न्यायालयाने विचारला आहे. अक्षय शिंदेच्या शवविच्छेदन अहवालानुसार मोठा रक्तस्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. तसेच त्याच्या डोक्याला एक गोळी लागल्याचे म्हटले आहे.

वर दिलेली कायद्याची तरतूद आणि अक्षय शिंदेवर स्वसंरक्षणार्थ झालेला गोळीबार या दोन्हीमध्ये तफावत असल्याचे दिसते आणि त्यामुळेच या सगळ्या प्रकाराबद्दल संशय निर्माण होतो. अक्षयने पोलिसांची पिस्तूल हिसकावून त्यांच्यावर हल्ला केला, पण त्याचवेळी स्वसंरक्षणार्थ पोलिसांकडून त्याच्या डोक्यावर कशी काय गोळी मारली गेली? हे अनाकलनीय आहे.

एक गोष्ट इथे समजून घेतली पाहिजे की आपल्याकडे कोणत्याही व्यक्तीला अटक केल्यानंतर 24 तासांच्या आत न्यायालयापुढे हजर करावे लागते. त्या व्यक्तीवर काय आरोप आहेत, त्यासाठी त्याची पोलीस कोठडी का गरजेची आहे हे न्यायालयापुढे सांगावे लागते आणि संबंधित प्रकरणातील तथ्य समजून घेतल्यानंतर न्यायालय त्याला पोलीस कोठडी द्यायची का, किती दिवसांसाठी द्यायची याचा निर्णय घेते.

एकदा पोलिसांनी आरोपीला न्यायालयापुढे हजर केले की तो न्यायालयाच्या देखरेखीखाली असतो. न्यायालयाच्या आदेशाशिवाय पोलीस त्या आरोपीबाबत काहीही निर्णय घेऊ शकत नाहीत. आरोपीची पोलीस कोठडी वाढवायची का, त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवायचे का, जामीन द्यायचा का हे सर्व ठरवण्याचा अधिकार केवळ आणि केवळ न्यायालयाचा आहे. न्यायदानाच्या प्रक्रियेत न्यायालयांना मदत करण्यासाठी पोलीस आहेत. त्यांनी स्वतःहून कोणालाही न्याय द्यायचा नाही. तो त्यांचा अधिकारच नाही.

अक्षय शिंदे प्रकरणात जे काही समोर येत आहे ते त्या दिवशी नक्की काय घडले याबद्दल संशय निर्माण करायला लावणारे आहे. चार पोलिसांच्या कोठडीत असताना अक्षय शिंदे एका पोलिसाचे पिस्तूल हिसकावतो काय, त्यामध्ये गोळ्या भरतो काय आणि पोलिसांवर गोळ्या झाडतो काय, हे सगळे घडत असतानाच पोलिसांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न का केला नाही.

एक आरोपी विरुद्ध चार पोलीस असे असताना आरोपी पोलिसांवर गोळीबार करण्यामध्ये यशस्वी ठरतो काय, मग त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी पोलिसांकडून थेट अक्षय शिंदेवर गोळीबार केला जातो काय, त्याच्या डोक्यावर गोळी झाडली जाते काय, यामध्ये त्याचा मृत्यू होतो काय आणि हे सगळे तो पोलिसांच्या वाहनातून जात असताना त्यामध्येच घडते काय, या सगळ्याबद्दल शांतपणे विचार केला तर मनात शंकेची पाल चुकचुकतेच.

आपल्या न्यायव्यवस्थेमध्ये आणखी एक तत्त्व आहे. ते असे की Justice should not only be done, but should undoubtedly be seen to be done.

याचा अर्थ न्याय केवळ दिला न जाता तो दिला गेला हे दिसलेही पाहिजे. पोलिसांनी त्या दिवशी जे काही केले, ते व्हॅनच्या आतमध्ये. त्यामुळे तिथे नक्की काय घडले याबद्दल कोणाच्याही मनात शंका उपस्थित होऊ शकते. यामध्ये अक्षय शिंदेचा मृत्यू झाला म्हणजे न्याय झाला, असे म्हणता येणार नाही.

कारण आधी म्हटल्याप्रमाणे न्याय होण्याची जी प्रक्रिया आपण स्वीकारली आहे तिच्याशिवाय कोणीतरी आरोपीला स्वसंरक्षणार्थ गोळ्या घालून संपवत असेल तर तिथे न्याय झाला असे म्हणता येणार नाही. न्याय देण्याचा अधिकार हा केवळ आणि केवळ न्यायालयाला आहे. इतर कोणीही ते काम आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न करू नये. कारण ते देश म्हणून आपल्यासाठी घातक आहे.

या प्रकरणाला दुसराही एक कंगोरा आहे. या संपूर्ण प्रकारानंतर सोशल मीडियावर, समाजामध्ये काही जणांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या किंवा ज्या पद्धतीने सेलिब्रेशन केले तेसुद्धा न्यायव्यवस्थेने समजून घेतले पाहिजे. न्याय मिळायला लागणारा विलंब हा आता लोकांचा त्या व्यवस्थेवरचा विश्वासच उडण्यापर्यंत जाऊन पोहोचला आहे. ‘तारीख पे तारीख’ यामध्ये न्यायव्यवस्था अडकणार असेल, तर सामान्य नागरिक या पद्धतीने पोलिसांकडून दिलेला न्याय योग्य असल्याचे सांगू लागतात.

कायदे चांगले आहेत, त्यातील शिक्षेच्या तरतुदीही चांगल्या आहेत, पण यासोबतच न्यायदान होऊन आरोपी जर दोषी असेल तर त्याला तातडीने शिक्षा व्हायला हवी आणि निर्दोष असेल तर त्याला इतर सामान्य लोकांप्रमाणे जीवन जगता यायला हवे, ही किमान अपेक्षा आहे. होते असे की न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये वेगवेगळ्या कारणाने विलंब होत जातो आणि मग लोक सगळी घटना विसरून गेल्यावर त्यांना कधीतरी मागच्या कुठल्या एका प्रकरणामध्ये न्यायालयाने निकाल दिल्याचे समजते. तोपर्यंत अनेकांना मूळ घडले काय होते हेच विस्मरणात गेलेले असते. जोपर्यंत न्याय दिला जाण्याची प्रक्रिया गतिमान होणार नाही, तोपर्यंत लोकांचा त्यावरील विश्वास वाढण्याला मदत होणार नाही.

लोकशाहीमध्ये व्यवस्था कायम असते, राज्यकर्ते बदलत राहतात. लोकांचा व्यवस्थेवरील विश्वास जितका वाढेल तितके राज्यकर्त्यांवरील अवलंबित्व कमी कमी होत जाईल. सध्या स्थिती अशी आहे की नगरसेवकांपासून वरच्या भाजणीने सगळेच व्यवस्थेवरील विश्वास वाढवण्यापेक्षा स्वतःचे महत्त्व वाढवण्याकडे जास्त लक्ष देतात.

मग कधी कधी एखाद्या आरोपीचा अशा पद्धतीने एन्काऊंटर होतो आणि न्याय दिला म्हणत राज्यकर्ते त्यावर आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करतात. रोजच्या जगण्यात अनेक अडचणींना सामोरा जाणारा सामान्य माणूस अशा एखाद्या घटनेवरून मनातील व्यवस्थेवरची खदखद, राग व्यक्त करतो आणि जे झाले ते बरे झाले, असे म्हणू लागतो.

बदला घेण्याची वृत्ती वाढत जाण्याअगोदर न्याय होण्याची प्रक्रिया गतिमान झाली पाहिजे. कारण ती प्रक्रिया जास्त पारदर्शक आहे. त्यामध्ये दोन्ही बाजू ऐकण्याला महत्त्व आहे आणि न्याय देणारा तटस्थ आहे. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर ज्याप्रमाणे न्याय मिळाल्याची भावना निर्माण झाली ते लोकशाही देश म्हणून आणि समाज म्हणून आपल्यासाठी जास्त घातक आहे हे कायम लक्षात ठेवले पाहिजे.

# ‘तापी’ प्रकल्पाने भारताला थेट फायदा

अभय कुलकर्णी

तुर्कमेनिस्तान ते भारत यादरम्यानच्या महत्त्वाकांक्षी आणि रेंगाळेल्या ‘तापी’ गॅस पाईपलाईनचे काम पुन्हा सुरू झाले. या गॅस पाईपलाईनच्या माध्यमातून गॅस तुर्कमेनिस्तान, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमार्गे भारतापर्यंत पोचणार आहे. या पाईपलाईनच्या माध्यमातून भारतात विजेची टंचाई बऱ्यापैकी कमी होऊ शकते.

तापी गॅस पाईपलाईन प्रोजेक्टनुसार तुर्कमेनिस्तानहून हा नैसर्गिक वायू अफगाणिस्तानमार्गे पाकिस्तान अणि नंतर भारतात येणार आहे. तापी हे नाव तुर्कमेनिस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान अणि इंडिया गॅस पाईपलाईन या आधारावर तयार झाले आहे. दीर्घकाळापासून प्रलंबित असणारा प्रकल्प पुन्हा सुरू होत आहे. दहा अब्ज डॉलरच्या या प्रोजेक्टमधधील आपला वाटा उचलण्याची अफगाणिस्तानने तयारी केली असून कामही सुरू केले आहे. तुर्कमेनिस्तानच्या गल्किनीश गॅस क्षेत्रातून दक्षिण आशियापर्यंत नैसर्गिक गॅस पाईपवाटे पोहोचणार आहे. तापी पाईपलाईन प्रोजेक्टला अफगाणिस्तानातील कायदा आणि सुव्यवस्था तसेच हिंसाचारामुळे विलंब झाला होता. परंतु आता अफगाणिस्तानच्या तालिबान शासकांनी या प्रलंबित योजनेवर काम सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने भारताला दिलासा मिळाला आहे. ही पाईपलाईन सुरू झाल्यांनतर दरवर्षी 33 अब्ज क्युबिक मीटर गॅस तुर्कमेनिस्तानहून मिळेल.

अफगाणिस्तानसाठी ही पाईपलाईन महत्त्वाची आहे. भारत आणि पाकिस्तान या प्रोजेक्टमधील 42-42 टक्के वाटा खरेदी करतील. अफगाणिस्तान 16 टक्के गॅस खरेदी करेल. त्याचबरोबर दरवर्षी पाईपलाईनचे भाडे म्हणून अफगाणिस्तान 500 दशलक्ष डॉलरची कमाई करेल. खरे पाहता या प्रकल्पावर 90 च्या दशकात चर्चा सुरू झाली. तुर्कमेनिस्तानने आपल्या गॅस साठ्यातून अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारताला गॅस पुरवण्याचा प्रस्ताव ठेवला. मात्र, चार देशांदरम्यान करार होण्यासाठी 20 वर्षे लागली. 2010 मध्ये आंतरसरकारी करारावर स्वाक्षरी झाली. मे 2012 मध्ये द्विपक्षीय विक्री करारावर स्वाक्षरी झाली. 2013 मध्ये चार देशांच्या सरकारी गॅस कंपनीला तापी पाईपलाईन कंपनीचे भागीदार करण्यात आले. तुर्कमेनिस्तानकडून 2015 मध्ये या प्रकल्पाची पायाभरणी झाली होती. 2018 मध्ये अफगाणिस्तानात त्याचे काम सुरू होणे अपेक्षित होते. परंतु त्यात वारंवार अडथळे आले. तापी गॅस पाईपलाईनची लांबी 1100 मैलपर्यंत असू शकते आणि या माध्यमातून दरवर्षी 33 अब्ज क्युबिक मीटर नैसर्गिक गॅसचा पुरवठा होईल.

तुर्कमेनिस्तानच्या गल्किनिश गॅस क्षेत्रातून पाईपलाईन टाकली जाणार असून ती भारतातील फाजिल्का शहरात पोहोचेल. या योजनेची संकल्पना 1990 च्या दशकात मांडली होती. तेव्हा त्या प्रकल्पाचा खर्च दहा अब्ज डॉलर होता. परंतु आता खर्च अनेक पटींनी वाढला आहे. 2018मध्ये तापी पाईपलाईनचे काम सुरू झाले. परंतु सुरक्षेच्या कारणावरून ते तत्काळ बंद करण्यात आले. या प्रकल्पाच्या कामात सामील असलेल्या कामगारांची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केल्याने प्रोजेक्टचे काम थांबले.

तापी गॅस पाईपलाईन योजनेने भारताला अनेक फायदे होऊ शकतात. ‘तापी’ भारताला नैसर्गिक गॅसचा एक अतिरिक्त स्रोत देण्याचे काम करेल. यामुळे पारंपरिक ऊर्जा स्रोत जसे की, कोळसा आणि तेलावरचे अवलंबित्व कमी होण्यास मदत मिळेल. तापी प्रकल्पाच्या माध्यमातून तुर्कमेनिस्तानहून नैसर्गिक गॅस उपलब्ध होण्याची निश्चित हमी मिळत असल्याने भारताच्या ऊर्जा निश्चितीत वाढ होणार आहे. ऊर्जा स्रोतांत वैविध्यपणा आणल्याने ऊर्जा आयातीसाठी एखाद्या देशावर अवलंबून राहण्याची जोखीमही कमी होण्यास हातभार लाागेल. नैसर्गिक गॅसची उपलब्धता ही भारताच्या आर्थिक वृद्धीला आणि औद्योगिक विकासाला चालना देऊ शकते. त्याचबरोबर भारताचा आयातीवरचा खर्चही कमी राहू शकतो. चारही देशांना लाभदायी ठरणारा हा प्रकल्प सुरळीत पूर्ण व्हावा, यासाठी चारही देशांनी सजग राहणे आवश्यक आहे. हिंसाचार वा अन्य मार्गाने कुणी या प्रकल्पात खोडा घालणार नाही, याची काळजी सगळ्यांनाच घ्यावी लागेल. भारताला आपली आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ऊर्जासुरक्षा अत्यंत गरजेची आहे.

# अति ताणाचे बळी

अशोक सुतार



कामाच्या ठिकाणी अति ताणामुळे कर्मचाऱ्यांवर परिणाम होतो. त्यामुळे शारीरिक आजार आणि मानसिक नैराश्याचे अनेक जण बळी ठरतात, असे अनेक अहवाल सांगतात.

सध्याचे जग धावपळीचे झाले आहे. भरपूर पैसे कमावण्याच्या नादात किंवा कमी कालावधीत जास्त काम केल्यामुळे अनेक कंपन्यांमधील कर्मचारी विमनस्क अवस्थेत जगत असतात. जगभरात अनेक कंपन्यांमध्ये यंत्रवत काम सुरू असते. त्यामुळे जीवनशैली बदलली आहे. संगणकावर 16 ते 18 तास काम करीत असल्यामुळे स्वास्थाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण याचा प्रतिकूल परिणाम शरीर व मनावर होतो. या स्थितीमुळे व कामाच्या अति ताणामुळे जगभरात अनेकांचे बळी जातात. असाच एक प्रकार पुण्यातील अर्न्स्ट अँड यंग (ईवाय) या बहुराष्ट्रीय कंपनीत घडला आहे.

या कंपनीत काम करणाऱ्या तरुण सनदी लेखापाल (सीए) तरुणीचा कामाच्या अति ताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे तरुणीच्या अंत्यसंस्काराला तिच्या कार्यालयातील एकही कर्मचारी हजर नव्हता. याचे कारण म्हणजे कर्मचाऱ्यांमध्ये नोकरी जाईल ही भीती होती किंवा अंत्यसंस्काराला कोणी जायचे नाही, अशी कंपनीची ताकीद असावी, असे वाटते. यावरून तरुणीच्या आईने संताप व्यक्त केला होता. यावर कंपनीचे अध्यक्ष राजीव मेमानी यांनी लिंक्डइनवरून एक पोस्ट करत मृत पावलेल्या तरुणीच्या कुटुंबाची माफी मागितली आहे. रोजगार टिकवून ठेवण्यासाठी कर्मचारी कंपनी व्यवस्थापनाच्या हाताचे बाहुले कसे बनले आहेत, हे या प्रकारातून दिसून येते.

कामाच्या अति ताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा मृत तरुणीच्या आईने केल्यानंतर केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने देशभरात असुरक्षित आणि शोषणयुक्त कामाच्या वातावरणाची चौकशी करण्याचे संकेत दिले आहेत. अति ताणामुळे एखाद्या कर्मचाऱ्याचा जीव जावा ही दुर्दैवी घटना आहे. याप्रकरणी केंद्रीय कामगार मंत्रालयाने चौकशी सुरू केली आहे, तर येरवडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. माजी केंद्रीय माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी समाज माध्यमावर एक पोस्ट करत या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. तसेच चंद्रशेखर यांनी याप्रकरणी केंद्रीय कामगार मंत्रालयाला चौकशी करण्याचे आवाहन केले होते. याला प्रतिसाद देत केंद्रीय कामगार राज्यमंत्री करंदलाजे यांनी चौकशी करण्याचे जाहीर केले. याप्रकरणी न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

चौकशी होईल, परंतु याप्रकरणी जबाबदार कुणाला धरणार? पूर्वीच्या कामगार कायद्यांची धार कंत्राटी पद्धतीच्या नव्या कायद्याने बोथट झाली आहे.26 वर्षीय सनदी लेखापाल तरुणी ॲना सॅबेस्टियन पेरायिलचा मृत्यू झाल्यानंतर आता अनेकजण कामाच्या ठिकाणी असणाऱ्या तणावाबाबत बोलू लागले आहेत, तर अनेकांनी कामाच्या ठिकाणी असणाऱ्या तणावाबाबत आपापली मते व्यक्त केली आहेत. भारत पे कंपनीचे सहसंस्थापक आणि शार्क टँक या कार्यक्रमामुळे लोकप्रिय झालेले अशनीर ग्रोवर यांनीही या कंपनीतील त्यांचा कटू अनुभव कथन केला आहे.

अशनीर ग्रोवर यांचा एक जुना व्हिडिओ पुन्हा व्हायरल होत आहे. प्रसिद्ध उद्योगपती हर्ष गोयंका यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. ग्रोवर यांनी याच कंपनीतील कामाचा अनुभव कथन करताना एका मुलाखतीत म्हटले आहे की, ‘पहिल्या दिवशी जेव्हा कार्यालयात गेलो, त्यानंतर जे दिसले, ते पाहून धक्का बसला. मग मी छातीत दुखायला लागले असे सांगितले आणि तिथून पळ काढला. तिथे अक्षरशः मरणासन्न अवस्थेत आलेले कर्मचारी पाहून मला वाईट वाटले. असे वाटत होते की, तिथे मृतदेह पडले आहेत आणि त्यांचे फक्त अंत्यसंस्कार करायचे बाकी राहिलेत.’ ग्रोवर यांनी बड्या कंपन्यांत सुरू असलेले भयाण वास्तव चित्रणच रेखाटले आहे.

अशनीर ग्रोवर यांनी म्हटले होते की, मला एक कोटी पगार आणि भागीदारी मिळाली होती. परंतु तिथे काम करण्याची त्यांना इच्छा नव्हती. ग्रोवर यांनी बोलण्याच्या ओघात टॉक्सिक कल्चरचा मुद्दा मांडला आहे. परंतु यावर लोकांच्या उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. काहीजण या वातावरणाला टॉक्सिक कल्चर म्हणतात. पण काम तर तिथेच होते, बाकी नॉन टॉक्सिक कल्चरचे खूप कार्यालय बघायला मिळतात. टॉक्सिक कल्चर याचा अर्थ मराठी भाषेत विषारी संस्कृती असा होतो. म्हणजे कामाच्या ठिकाणी वाद, भांडणे आणि स्पर्धा निर्माण करायची. तेथील वातावरण कृत्रिमरीत्या क्रियाशील करायचे आणि कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम कमी वेळेत करून घ्यायचे. हीच पद्धत जगभरातील अनेक बड्या कंपन्यांत सुरू झाली आहे; परंतु अशी विषारी संस्कृती रुढ करून भौतिकदृष्ट्या कंपनीचा फायदा होत असला तरी कर्मचाऱ्यांच्या आयुष्याशी कंपनी व्यवस्थापन खेळत असते हे निषेधार्ह आहे. मानवीय मूल्यांच्या वा नैतिक मूल्यांच्या दृष्टीने ते योग्य नाही.

सोशल मीडियावर ॲनाच्या मृत्यूची ही बाब पसरल्यानंतर कंपनीवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी कंपनी व्यवस्थापना विरोधात कोणतीही कायदेशीर पावले उचलली जाणार नसल्याचे ॲनाच्या वडिलांनी स्पष्ट केले आहे. मात्र, याप्रकरणी योग्य ती चौकशी केली जाईल, असे आश्वासन केंद्रीय कामगार व रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी दिले आहे. ॲना या वर्षी फेब्रुवारीमध्ये सीए परीक्षा पास झाली होती आणि मार्चमध्ये या कंपनीमध्ये रुजू झाली होती. तिला कामाचा प्रचंड ताण होता, असा तिच्या वडिलांनी आरोप केला आहे. तिच्या कामाच्या वेळापत्रकामुळे तिला क्वचितच झोप मिळत असे. तिला योग्य आहारही घेता येत नव्हता. ॲनाच्या आईने ईवाय कंपनीच्या चेअरमनला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, आमची मुलगी गेली तरी असा प्रकार इतर कोणत्याही व्यक्तीसोबत होऊ नये.

कंपन्यांच्या बदलत्या कामाच्या पद्धतीमुळे, कर्मचाऱ्यांना अति ताण येतो, हे नाकारता येत नाही. साहजिकच अति ताणाच्या कामामुळे बळी पडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता भविष्यात नाकारता येत नाही, हेच गंभीर वास्तव आहे. मोठमोठ्या कंपन्यांतील असुरक्षित व तणावाखाली असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी उपाययोजना गरजेची आहे.

छोट्या बातम्या

## माजी खासदार संजय पाटील यांच्यासह पाच जणांवर गुन्हा

कवठेमहांकाळ । कवठेमहांकाळ नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारास अर्ज भरण्यासाठी मदत करत आहे, या कारणावरून माजी उपनगराध्यक्ष अय्याज सय्यद मुल्ला यांना भाजपचे माजी खासदार संजय पाटील यांच्यासह स्वीय सहायक खंडू होवाळे व आणखी पाच व्यक्तींवर शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पोलिसात गुन्ह्य दाखल झाला आहे. कवठेमहांकाळ येथील दादा चौकातील मुल्ला यांच्या घरी ही मारहाणीची घटना शुक्रवारी (दि. २७) सकाळी घडली. सदर घटनेची फिर्याद अय्याज मुल्ला यांनी पोलिसांना दिली आहे. अय्याज मुल्ला यांच्या घरात घुसून शिवीगाळ करत मारहाण केली. या वेळी मुल्ला यांचा मुलगा कैफ, पुतण्या एजाज, अनिस आणि आई हाजराबी यांना ढकलून खाली पाडले. तू भविष्यात जिवंत कसा राहतो, असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे मुल्ला यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसात माजी खासदार संजय पाटील व स्वीय सहायक होवाळ यांच्यावर कवठेमहांकाळ पोलिस स्टेशनमध्ये सायंकाळी गुन्हा दाखल झाला. सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर हे पुढील तपास करीत आहेत. माजी उपनगराध्यक्ष अय्याज मुल्ला यांना मारहाण झाल्यानंतर आमदार सुमनताई पाटील, युवा नेते रोहित पाटील, जिल्हा बँकेचे संचालक सुरेश पाटील हे कवठेमहांकाळ पोलिस ठाण्यात पोहोचले. माजी खासदार संजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत ठिय्या आंदोलन थांबवणार नाही, असा पवित्रा घेतला होता. कवठेमहांकाळ नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडीच्या कारणावरून माजी खासदार संजय पाटील यांचे स्वीय सहायक खंडू होवाळ यांना गुरुवारी रात्री शहरातील कुची कॉर्नर येथे जातीवाचक शिवीगाळ व मारहाण केली. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते माजी उपनगराध्यक्ष अय्याज मुल्ला, बाजार समितीचे माजी सभापती दादासाहेब उर्फ पिंटू कोळेकर, शहराध्यक्ष बाळासाहेब पाटील यांच्यावर शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. माजी खासदार संजय पाटील यांनी फोनवरून शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे माजी खासदारांकडून आमच्या व आमच्या परिवाराच्या जीवाला धोका आहे. आम्हाला संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी बाजार समितीचे माजी सभापती दादासाहेब कोळेकर व राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील साळुंखे व पोलिस निरीक्षक जोतिराम पाटील यांच्याकडे अर्जाद्वारे केली आहे.

## दिल्लीतून लागला सुगावा; वरोरात बनावट हापिंकची विक्री

वरोरा : शहरातील अनेक दुकानांत चक्क बनावट हार्पिक आणि लायझोलची विक्री सुरु असल्याचा सुगावा कंपनीच्या दिल्ली येथील कार्यालयास लागला. कंपनीच्या सल्लागाराने वरोऱ्यात येऊन तक्रार दाखल करताच पोलिसांनी गुरुवारी (दि.२६) रात्री दुकानांत धाड टाकली. या धाडीत ४६ हजारांचा बनावट मुद्देमाल जप्त करून तीन दुकानदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आनंद किराणा शॉप, वानखेडे एजन्सी, अतुल प्लास्टिक, अशी दुकानांची नावे आहेत. मागील दशकभरात वरोरा शहरातील बाजारपेठेचा मोठा विस्तार झाला. ठोक व्यापाऱ्यांची संख्या वाढली. अनेक व्यापारी दिल्ली, मुंबई व नागपूर शहरांतूनही मालाची ठोक खरेदी करू लागले. किराणा कापडपासून ते ट्रेडिंगच्या व्यवसायात कोट्यवधींची उलाढाल होत आहे. मोठ्या महानगरांशी कनेक्टिव्हिटी वाढली. त्यातून नफा मिळविण्याच्या स्पर्धेत काहींनी अवैध मार्गाचाही वापर सुरु केल्याचा आरोप नागरिकांकडून असतो. अशा स्थितीत शहरातील आनंद किराणा शॉप, वानखेडे एजन्सी, अतुल प्लास्टिक या दुकानांत बनावट हार्पिक आणि लायझोल विक्री सुरु असल्याची माहिती व्यापारी वर्तुळात पसरली. ही बाब हार्पिक आणि लायझोल उत्पादन करणाऱ्या दिल्ली येथील कंपनीपर्यंत पोहोचली. त्यामुळे कंपनीच्या सल्लागाराने दिल्लीतून थेट वरोरा गाठले. गुरुवारी रात्री याबाबत तक्रार दाखल केली. रात्री तीन दुकानांवर छापा टाकण्यात आला. यामध्ये ४६ हजार रुपये किमतीचे बनावट हार्पिक आणि लायझोल आढळून आले. पोलिसांनी दुकानदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ६३, ६५ कॉपीराइट व ३१८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कारवाई पोलिस निरीक्षक अजिंक्य तांबडे यांच्या नेतृत्वात विनोद जांभळे, भस्मे, मोहन निषाद दुधे, दिलीप सूर, मनोज ठाकरे आदींनी कारवाई केली. हार्पिक बनविण्यासाठी हायड्रोक्लोरिक ॲसिड, हायड्रॉक्सिथिल ओलेमाइन, अमोनियम क्लोराइड, मिथाइल सॅलिसिलेट, ब्यूटिलेटेड हायड्रॉक्सिटोल्युइन, ॲसिड ब्लू २५, ॲसिड लाल ८८, डीआयोनाइज्ड व पाणी यासारख्या घटकांचा वापर केला जातो, अशी जाणकारांची माहिती आहे.

# उच्च माध्यमिक स्तरापर्यंत आता मराठी विषय सक्तीचा



वर्धा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत १३ सप्टेंबर २०२४ ला एक महत्त्वपूर्ण शालेय परिपत्रक जाहीर करण्यात आले. या परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्वच प्रकारच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन इयत्ता बारावीपर्यंत सर्वच विद्याशाखेत सक्तीचे करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयाचे स्वागत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाने केले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. गिरीश काळे यांनी दिली. शासनाच्या या परिपत्रकाची दखल घेत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाने तातडीची आभासी सभा प्रा. सुनील डिसले यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव बाळासाहेब माने, उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश हटवार यांच्या उपस्थितीत आयोजित केली. या सभेत महाराष्ट्रात मराठी विषय इयत्ता बारावीपर्यंत सर्व विद्याशाखेत सक्तीचा केल्याने शासनाच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. मराठी भाषेचे संवर्धन व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन सक्तीचे करण्यासाठी सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ दिनांक ९ मार्च, २०२० आणि मराठी भाषा विभागाने राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्ययन व अध्यापन अधिनियम २०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना दि. १६ मार्च २०२० रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन सक्तीचे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०२० पासून करण्यात आली आहे. कोविड २०१९ च्या संसर्गजन्यच्या पार्श्वभूमीवर मराठी विषय सक्तीचा केला; पण इयत्ता दहावीपर्यंत मराठी विषयाची परीक्षा गुणांक न ठेवता श्रेणी स्वरूपात करण्याचा निर्णय दि. १९ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे. ही सवलत फक्त एका बॅचपुरतीच मर्यादित आहे. भाषेचे सक्तीचे अध्ययन व अध्यापन अधिनियम २०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना दि. १६ मार्च २०२० रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन सक्तीचे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०२० पासून करण्यात आली आहे. कोविड २०१९ च्या संसर्गजन्यच्या पार्श्वभूमीवर मराठी विषय सक्तीचा केला; पण इयत्ता दहावीपर्यंत मराठी विषयाची परीक्षा गुणांक न ठेवता श्रेणी स्वरूपात करण्याचा निर्णय दि. १९ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे. ही सवलत फक्त एका बॅचपुरतीच मर्यादित आहे. यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करून मागणी केली होती. शासनाने राजभाषा धोरण ठरवताना व मराठी भाषाविषयक धोरण ठरवताना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या व शासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावी व बारावीकरिता सर्वच विद्याशाखेत मराठी भाषेचे अध्ययन अध्यापन सक्तीचे करण्यात आल्याने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. या आभासी सभेला वर्धा जिल्हा प्रतिनिधी प्रा. गिरीश काळे यांच्यासह ३४ जिल्हा प्रतिनिधी व १६ प्रांतीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती, असे प्रा. गिरीश काळे यांनी सांगितले. उच्च माध्यमिक शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा व्हावा, याकरिता महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यायीन मराठी विषय शिक्षक महासंघाने पहिल्या अधिवेशनातच ठराव घेऊन पाठपुरावा केला. याचे फलित मिळाले असून महासंघाने या निर्णयाचे स्वागत केले असून यापुढेही मराठी सक्तीची व्हावी, यासाठी प्रयत्न राहणार आहे. या निर्णयाचे स्वागत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाने केले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. गिरीश काळे यांनी दिली. शासनाच्या या परिपत्रकाची दखल घेत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाने तातडीची आभासी सभा प्रा. सुनील डिसले यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव बाळासाहेब माने, उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश हटवार यांच्या उपस्थितीत आयोजित केली.

## कोल्हापुरात तीन वर्षांत ४१२ नवीन रस्ते खराब; ठेकेदार नामानिराळे, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

कोल्हापूर । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून गेल्या तीन वर्षांत शहराच्या विविध भागांत ठेकेदारामार्फत करण्यात आलेले ४१२ सार्वजनिक रस्ते दायित्व कालावधीत खराब झाले. त्यावर खड्डे पडले. रस्त्यांची चाळण झाली. इतक्या मोठ्या प्रमाणात रस्ते खराब होत असताना किरकोळ नोटीस देण्यापलीकडे प्रशासनाकडून ठेकेदारांवर काहीच कारवाई केली जात नाही, उलट त्यांनाच सन्मानाने नवीन रस्ते करण्याच्या निविदा मंजूर केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. महानगरपालिका प्रशासनाने स्वत: रस्ते करण्याचे सोडून दिले आहे. त्यामुळे आता ठेकेदार हाच एक पर्याय स्वीकारला जातो. प्रत्येक वर्षी विविध प्रकारच्या निधीतून ३० ते ३५ कोटींचे रस्ते केले जातात. जवळपास अडीच ते तीन कोटी रुपये रस्त्यांच्या पॅचवर्कवर खर्च केले जातात; परंतु तेच अधिकारी, तेच तेच ठेकेदार आणि त्यांच्यात टक्केवारीचे सूत जमल्यामुळे इतका निधी खर्च करूनही रस्ते दर्जेदार तसेच टिकाऊ होत नाहीत. रस्त्यांसाठी असलेल्या तीन वर्षांचा दायित्व कालावधी पूर्ण होण्याच्या आतच रस्ते खराब होत आहेत. महापालिका प्रशासनाने सन २०२१-२०२२, सन २०२२-२०२३ आणि २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात किती रस्ते करण्यात आले आणि त्यातील किती रस्ते दायित्व कालावधी पूर्ण व्हायच्या आत खराब झाले याची माहिती सार्वजनिक केली आहे. या माहितीवर नजर टाकली तर ४७४ रस्ते खराब झाल्याचे म्हटले आहे; परंतु त्यापैकी ६२ रस्त्यांची नुसते कार्यारंभ आदेश झाले आहेत, त्यांच्या कामांना अद्याप सुरुवात झालेली नाही. ४१२ रस्ते ठेकेदाराने दिलेल्या गॅरंटी काळातच खराब झाले, त्याची चाळण झाली आहे. २०२१-२०२२ सालात



ज्यांचे रस्ते खराब झाले, त्यांनाच पुढील दोन वर्षांत रस्त्यांची कामे दिली आहेत. जर त्यांच्या रस्त्यांचा दर्जाच खराब असेल तर त्यांच्या ऐवजी अन्य ठेकेदारांना कामे देणे अपेक्षित होते; परंतु येथे अधिकारी-ठेकेदार यांच्यातील संगनमत आडवे आले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे जर जास्तच गलका झाला, आंदोलने झाली तर तीन- चार फुटकळ ठेकेदारांना नोटीस काढायच्या आणि रस्ते दुरुस्त करून घेतल्याचे दाखवायचा फार्स अधिकारी मात्र इमामेइतबारे करत आहेत.

## कन्हानमध्ये होणार राज्यातील पहिली महिला एमआयडीसी

नागपूर । प्रतिनिधी

राज्याच्या औद्योगिक उभारणीमध्ये महिलांनाही प्राधान्य मिळावे, हक्काची जागा मिळावी, उद्योजक म्हणून त्यांनाही आपली ओळख निर्माण करता यावी यासाठी लवकरच विदर्भात महिलांसाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात येत आहे. राज्यातील पहिली महिला एमआयडीसीनागपूर जिल्ह्यातील कन्हान येथे उभारण्यात येणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. शुक्रवारी नागपुरात हॉटेल सेंटर पॉइंट येथे महाराष्ट्राची उद्योग भरारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर आयोजित पत्रकार परिषदेत उद्योगमंत्री सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आ. आशिष जयस्वाल उपस्थित होते. सामंत यांनी सांगितले, नागपुरातील एमआयडीसीतील जागा आता संपलेली आहे. उद्योगांसाठी नवीन जागेची गरज आहे. त्यामुळे आमडी येथे ३ हजार एकरवर नवीन एमआयडीसी उभारण्यात येणार आहे, असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. महाराष्ट्रात वीज टेरीफ जास्त आहे. विदर्भातील टेरीफचे वीज दर कमी झाले नसेल तर ते लवकरच केले जाईल, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. उद्योगासाठी जागा घेतली परंतु त्याचा उपयोगच केला नाही, अशा उद्योगांची जमीन शासन आपल्या ताब्यात परत घेत आहे. त्याची सुरुवात झाली असून आतापर्यंत अशा अनेकांची जागा शासनाने परत घेतल्याचेही सामंत यांनी यावेळी सांगितले.

## आठ तालुक्यांतील १०४ आदिवासी गावांचा होणार कायापालट

गोंदिया । प्रतिनिधी

दुर्गम व अति दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांतील चार हजार ९६७ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील १०४ आदिवासी गावांचा समावेश असून, आदिवासी बांधवांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र व राज्य सरकारकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सन २०२४-२५ अर्थसंकल्पीय च्या अधिवेशनात जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली होती. १८ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या कॅबिनेट बैठकीत या अभियानाला मंजुरी देण्यात आली आहे. या अभियानाचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. पीएम-जनमन अभियानात १७ संलग्न असलेल्या मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याद्वारे सामाजिक पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, आजीविका यामधील तफावत भरून काढण्याचा प्रयत्न असणार आहे, तसेच आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे.

## माझी वसुंधरा अभियानात यवतमाळ पालिका राज्यात दुसरी

यवतमाळ । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्पर्धा घेण्यात आली. हे अभियान राबविण्यात यवतमाळ नगर परिषद राज्यात दुसऱ्या क्रमांकाची ठरली आहे. यामुळे नगरपालिकेला पाच कोटींचे बक्षीस मिळाले आहे. यासोबतच जिल्ह्याचाही या अभियानात अमरावती विभागात दबदबा असून, पहिला क्रमांक मिळाला. माझी वसुंधरा अभियान हे १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. १ ते ३ लाख लोकसंख्या असणाऱ्या नगर परिषदेच्या गटात यवतमाळ शहराने राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. हे अभियान तत्कालीन मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर यांच्या काळात राबविण्यात आले



होते. यासोबतच वणी व दारव्हा नगर परिषद, मारेगाव आणि बाभूळगाव नगर पंचायतीने अमरावती विभाग स्तरावर गुणांकन प्राप्त केले आहे. अमरावती विभागात जिल्ह्यातील तीन नगर परिषदा आणि दोन नगर पंचायती माझी वसुंधरा अभियानात गुणवत्तेत आल्या आहेत. राज्य शासनाने रोख पुरस्काराच्या विनियोगाची कार्यपद्धती निश्चित करून दिली आहे. यामध्ये ढोबळ मानाने बक्षिसाची ५० टक्के रक्कम शहरात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी खर्च करावी लागणार आहे. तर ५० टक्के रक्कम पर्यावरणपूरक इतर उपाययोजनांसाठी वापरावी, इतर उपाययोजनांच्या रकमेतून १० टक्क्यांपर्यंतची रक्कम माझी वसुंधरा अभियानामध्ये शहर स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धांच्या विजेत्यांना बक्षीस देण्यास मान्यता दिली आहे. बक्षिसाच्या रकमेतून जैवविवि- धतेच्या संवर्धनावर, जुन्या हरित क्षेत्राचे संवर्धन देखभाल, रोपवा- टिकांची निर्मिती, जलसंवर्धन उपक्रम, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नदी, तळे व नाल्याचे पुनरुज्जीवन, सौर- ऊर्जेवर चालणारे पथदिवे, विद्युत वाहन, चार्जिंग पॉइंट अशा ठळक बाबींवर ही रक्कम खर्च करता येणार आहे.

## पैशासाठी बलगवडेतील माजी सैनिकाचा खून

तासगाव । प्रतिनिधी

बलगवडे (ता. तासगाव) येथील निवृत्त सुभेदार गणपती शिंदे यांचा खून गावातीलच वैष्णव विठ्ठल पाटील याने केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गणपती शिंदे यांची मोटार विकून पैसे मिळवण्याच्या उद्देशाने त्यांचा खून केल्याची कबुली वैष्णव पाटील याने दिली आहे. गणपती शिंदे यांचा बुधवारी रात्री लोखंडी गजाने मारहाण करून खून करण्यात आला होता.




गुरुवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. याबाबत पोलिस अधीक्षक संदीप घुगे, अप्पर अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली संशयिताच्या शोधासाठी एलसीबीची पथके विविध ठिकाणी पाठवण्यात आली होती.गावातीलच वैष्णव पाटील याच्या हालचालीबाबत संशय निर्माण झाला. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यात रवाना करण्यात आली. संशयित वैष्णव पाटील हा मौजे देवगाव (ता. परंडा, जि. धाराशिव) येथे असल्याची माहिती मिळाली. तिथे जाऊन त्याला ताब्यात घेण्यात आले.

## शिक्षणाधिकारी यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

भंडारा । प्रतिनिधी

तालुक्यातील गुंथारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने एक शिक्षक देण्यात यावा, तसेच वर्गखोली मंजूर करण्यात यावी, या मागणीसाठी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी बुधवारी सकाळी शाळेला कुलूप ठोको आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेत जि. प. सदस्य अस्मिता गंगाधर डोंगरे, शिक्षणाधिकारी रवींद्र सोनटक्के यांनी शाळेत लवकरच शिक्षक नियुक्तीचे आश्वासन दिले. त्यानंतर दुपारी आंदोलनाची रितसर सांगता झाली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुंथारा येथे वर्ग १ ते ४ असून विद्यार्थी पटसंख्या ९८ आहे; परंतु शाळेत एका वर्गासाठी शिक्षक नाही. त्यामुळे विद्यार्थी अध्ययन व अध्यापन कार्यापासून दिवसभर वंचित असतात. तसेच शाळेतील वर्गखोलीची रचना षटकोनी असून एका वर्गात २५ पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे एकाच वर्गखोलीत दोन वर्ग बसविणे शक्य नाही, गत दोन वर्षांपासून या शाळेतील विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालय पाचगाव येथे निवड होत आहे; परंतु सद्यःस्थितीत एक शिक्षक नसल्यामुळे गरीब होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेची समस्या सोडविण्यासंबंधीचे निवेदने अधिकारी व पदाधिकाऱ्यांना देऊनही टाळाटाळ होत असल्याने बुधवारी सकाळी १० वाजतापासून सरपंच रमेश चावरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भारत गोमासे व पंचायत समितीचे माजी सदस्य गुड्डू सार्वे यांच्या नेतृत्वात शाळेच्या प्रवेशव्दारासमोर आंदोलनाला प्रारंभ करण्यात आला.

लोकनायक अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली

# महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी एमआयडीसीत प्राधान्याने जागा देणार

अमरावती । प्रतिनिधी

उद्योग क्षेत्रामध्ये राज्य आघाडीवर आहे. उद्योग क्षेत्रामध्येही स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांचा टक्का वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी एमआयडीसीच्या क्षेत्रामध्ये स्वतंत्र भूखंड उपलब्ध करून दिले जातील, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. शुक्रवारी महाराष्ट्राची उद्योगभरारी कार्यक्रम शहरात पार पडला. यावेळी आमदार रवी राणा, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर आदी उपस्थित होते. ग्रामीण पातळीवर रोजगार निर्माण करणारी विश्वकर्मा योजना अमरावती जिल्ह्यात चांगल्या पद्धतीने राबविण्यात आली आहे. या योजनेत ५० हजारच्या जवळपास नोंदणी झाली. यातील ३० हजार लाभार्थींना किटचे वाटप करण्यात आले. दोन वर्षांत ३५ हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामीण पातळीवरील रोजगारासह मोठे उद्योग राज्यात येण्यासाठी उद्योग विभाग कार्य करीत आहे. राज्यातील एकही उद्योग बाहेर जाऊ दिल्या जाणार नाही. त्यासोबतच




गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात स्टील क्षेत्रातील गुंतवणूक होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या एक वर्षात येथील चित्र बदललेले असेल. संपूर्ण बाजारपेठेचा उद्योग क्षेत्राशी संबंध येतोच. त्यामुळे सामाजिक सक्षमीकरण करताना उद्योग क्षेत्राचा विचार करावाच लागतो. लाडकी बहीण योजनेतून महिलांचे सक्षमीकरण करीत असताना त्यांना मिळालेल्या मदतीतून बाजारपेठेतील आवश्यक वस्तूंची खरेदी होत असल्यामुळे एका दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. त्यामुळे राज्याचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी उद्योग क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. विदर्भाचा विकास व्हावा यासाठी नांदगाव पेठ येथे पीएम मित्रा टेक्सटाइल पार्क उभारण्यात येणार आहे. उद्योग क्षेत्रात सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही महत्त्वाची नांदी आहे. कार्यक्रमात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील नवनवीन आलेले उद्योग तसेच आलेल्या कंपन्यांविषयी एमआयडीसीचे आरओ माहिती देत नसल्याची तक्रार उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे पत्रकारांनी केली. यावेळी संबधित आरओ यांनी असे करू नये, त्यांनी जे काही चांगलं किंवा वाईट असेल ती माहिती माध्यमांना द्यायला हवी.

# 865 कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना ठरणार 'माईलस्टोन'

अमरावती | प्रतिनिधी

अमृत-२ वाढीव पाणीपुरवठा योजनेंतर्गत राज्य शासनाने ८६५.२६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तपोवन परिसर येथे या प्रकल्पाचा कोनशिला समारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाला. अमरावतीकरांकडे धरण होते; परंतु पाणी पोहोचवणारी पाइपलाइन जुनी झाल्याने ते शहराला पाणी पोहोचविताना अडचणी येतात; या निधीमुळे आता अमरावतीकरांचा २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटणार असल्याचे ना. पवार म्हणाले.



शहराच्या विकासासाठी राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी देण्यात आला आहे. यातून शहराच्या वैभवात भर पडणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण होतील. एकाच दिवशी १४२० कोटी रुपयांच्या कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. जिल्हा नियोजनच्या सभागृहात गुरुवारी विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार सुलभा खोडके, विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, अतिरिक्त जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे उपस्थित होते.

जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीची मागील सात वर्षांपासून जिल्ह्याला प्रतीक्षा होती. आता ही इमारत काही दिवसातच रुग्णांच्या सेवेत कार्यान्वित होणार असल्याने जुन्या इमारतीमध्ये होणारे गर्भवती व नवजातांचे हाल थांबतील.

सारथी'ला ५०० आसन क्षमतेचे श्रोतृगृह

शासनाला उत्पन्न देणाऱ्या विभागांकडून मोठ्या प्रमाणावर कर गोळा करण्यात येत आहे. त्या विभागांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहे. विकासकामे करताना पुढील काळाचा विचार ठेवण्यात आला आहे. 'सारथी' संस्थेमध्ये ३०० आसन क्षमतेचे श्रोतागृह मंजूर आहे; मात्र आता राज्यातील सर्व 'सारथी'च्या ठिकाणी ५०० क्षमतेचे श्रोतृगृह राहणार आहे. यासाठी लागणारा अतिरिक्त निधीही देण्यात येणार आहे.

विभागीय स्तरावर क्रीडा सुविधा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत शिक्षण, बारावीनंतर विद्यावेतन, शेतकऱ्यांना मोफत वीज, दुधाला अनुदान, तीन गॅस सिलिंडर तसेच 'सारथी', 'बार्टी'सारख्या संस्था उभारून अध्ययनासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात येत आहे.

## छोट्या बातम्या

### लाच स्वीकारताना तलाठीस अटक

नाशिक | शेतजमिनीवर कर्ज काढण्यासाठी नोंदीत फेरफार करून देण्यासाठी पंचांसमक्ष लाचेची मागणी करून १० हजार रुपयांची लाच शासकीय कार्यालयात स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिंडोरी तालुक्यातील वणी येथील तलाठी शांताराम गांगुर्डे यास ताब्यात घेतले. त्याच्यावर वणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराची वणी येथे शेती आहे. त्यावर कर्ज काढायचे असल्याने तलाठी गांगुर्डेची भेट घेत शेतगटाच्या नोंदीत फेरफार करण्यास सांगितले. या नोंदी दिंडोरी तहसील कार्यालयात मिळतील, असे तक्रारदारास सांगण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार दिंडोरी तहसील कार्यालयात गेले असता आवश्यक नोंदी मिळाल्या. परंतु, तीन नोंदी वणी येथील तलाठ्याकडे मिळतील, असे सांगण्यात आले. तक्रारदार यांनी पुन्हा तलाठी गांगुर्डेची भेट घेतली.

उताऱ्यावरील शेतजमिनीच्या क्षेत्राविषयी चुकीच्या नोंदी आहेत. त्या दुरुस्तीसाठी तक्रारदाराकडे १० हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर पंचासमक्ष कार्यालयात लाच स्वीकारतांना तलाठी गांगुर्डे यास लाचलुचपत प्रतिबंधकच्या पथकाने ताब्यात घेतले. निरीक्षक नितीन पाटील, पोलीस नाईक विनोद चौधरी, पोलीस शिपाई अनिल गांगोडे, चालक परशुराम जाधव यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### काँग्रेसचे माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे निधन

धुळे : काँग्रेसचे माजी मंत्री रोहिदास पाटील (८४) यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुलेग, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.२८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शहरातील देवपूर भागात असलेल्या नेहरू हौसिंग सोसायटी येथील निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार आहे.. एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालयाच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील. तत्पूर्वी सकाळी सात ते १० या वेळेत नेहरू हौसिंग सोसायटीतील सुंदर सावित्री सभागृहात त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. रोहिदास पाटील यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कृषी, महसूल, पाटबंधारे विभागाची मंत्रिपदे सांभाळली.

धुळे तालुक्यातील तत्कालीन कुसुंबा आणि आताच्या धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात पाटील यांनी निर्विवाद वर्चस्व राखले. विशाल खान्देशचे नेते अशी त्यांची ओळख होती. काँग्रेसच्या मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत त्यांचे नाव कायम घेतले जात असे. दाजी म्हणून लोकप्रिय असलेले रोहिदास पाटील हे काँग्रेसशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. लोकसभा निवडणुकीआधी खासदार राहुल गांधी यांनी काढलेल्या यात्रेप्रसंगी ते धुळ्यात आले असता त्यांनी आवर्जुन आजारी असलेले रोहिदास पाटील यांची भेट घेतली होती. या भेटीत इंदिरा गांधी यांच्याबरोबरच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला होता. काँग्रेसचे विद्यमान आमदार कुणाल पाटील यांचे ते वडील होत.

### रमेशकुमार सिंह यांना आठव्यांदा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




मुंबई | शिक्षणाशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आपल्या सर्वांना ज्ञानाच्या माळा घालणाऱ्या शिक्षकाचे आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. असे शिक्षक जे समाजासाठी आदर्श आधारस्तंभ ठरतात. त्यापैकी एक म्हणजे रमेशकुमार सिंह हे असून सलग आठव्यांदा त्यांना आदर्श शिक्षक या पदवीने गौरविण्यात आले आहे. रमेश कुमार सिंह हे आदर्श नाईट हिंदी हायस्कूल मुलुंड, सेंट उलई हिंदी स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय ठाणे येथील विद्यार्थ्यांना हिंदी, मराठी आणि समाजशास्त्राचे शिक्षण देत आहेत. आदर्श नाईट हिंदी हायस्कूल, मुलुंड गेल्या तीन वर्षांपासून उत्कृष्ट निकाल मिळत आहे. आदर्श नाईट स्कूल आणि रमेश सिंह यांच्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून पुरस्कारांची ही सलग हॅट्ट्रिक आहे. रमेशकुमार सिंह यांना 27 वर्षांत आठव्यांदा सर्वोत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. लायन्स क्लबच्या वतीने आयोजित समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या विशेष कामगिरीबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांसह सर्व स्तरातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## दिवा स्टेशन पुर्व परिसरातील वाहतूक कोंडी सुटणार

ठाणे | प्रतिनिधी



दिवा रेल्वे स्थानक पुर्व ते दिवा चौक परिसरातील वाहतूक कोंडीमुळे दिवेकरांसह वाहनचालक मेटकुटिला आले आहेत त्यात फेरीवाले व बेशिस्त रिक्षा चालक रिक्षा कोठेही उभी करतात त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा फटका हा रेल्वे फाटकाला देखील पडत असून त्यामुळे रेल्वे सेवा देखील कधी कधी बाधित होत आहे. शिवसेना दिवा शहराच्या मागणी नंतर आज दिवा स्टेशन परिसरातील होणारी वाहतूक कोंडी, रिक्षा स्टँडची जागा स्टेशन परिसरातील फेरीवाला याचा आढावा घेण्यासाठी ठाणे महानगरपालिकेचे सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्यासह संबंधित विभागीय अधिकारी, अभियंते, ठाणे वाहतूक विभागाचे वपोनि खराडे तसेच शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी, उपशहर प्रमुख शैलेश पाटील, मा. नगरसेवक अमर पाटील, दिपक जाधव तसेच आदेश भगत, उमेश भगत, चरणदास म्हात्रे यांच्यासह दिवा शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिवा स्थानक पुर्व ते दिवा चौक १५० मीटर वर फेरीवाला हटविणे, रिक्षा स्टॅण्ड जागा बदलने, रस्त्याच्या समांतर दोन्हीही बाजूने नवीन गटार तसेच दिवा चौकातील चंद्रागण इमारती समोर नवीन गटर बांधणे यावर सकारात्मक निर्णय झाला असल्याचे दिवा शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले आहे.

## नुकसानग्रस्तांना सरसकट मदत द्या नुकसानीची देशमुखांनी केली पाहणी

लातूर | प्रतिनिधी

**मुरुड व मुरुड महसूल मंडळात ढगफुटीसरश पावसामुळे पिकांचे नुकसान झाले असून नुकसानुकसानग्रस्तांना सरसकट भरीव आर्थिक मदत द्या अशी मागणी आमदार धीरज देशमुख यांनी केली. आ. देशमुख यांनी नकसानग्रस्त गावांची गुरुवारी पाहणी केली. पुरपरिस्थिती निर्माण झाल्याने श्री दत्त मंदिरात स्थलांतरित करण्यात आलेल्या नागरिकांची, नुकसानग्रस्त शेतकरी व व्यापाऱ्यांची भेट घेऊन त्यांना धीर देत त्यांच्याशी संवाद झाला.**

मंगळवारी रात्री अवघ्या चार तासात १०९ मिलीलिटर पाऊस झाल्याने शेतकऱ्याच्या काढणीला आलेल्या आणि काढून ठेवलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहेत. शिवाय, व्यापारी, दुकानदारांच्या दुकानात पाणी शिरल्याने त्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. घरात पाणी शिरल्याने ३०० हुन अधिक नागरिकांना श्री दत्त मंदिरात स्थलांतरित करावे लागले. या सर्व परिस्थितीची पाहणी आमदार देशमुख यांनी केली.

स्थलांतरित नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंच्या कीटचेही यावेळी वाटप करण्यात आले. यावेळी लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, मंडळ कृषी अधिकारी योगेश मुळजे, तालुका कृषी अधिकारी दिलीप राऊत, तलाठी कमलाकर आरडले आदींसह काँग्रेस व महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मुरुड आणि महसूल मंडळात हातातोंडाशी आलेले सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले आहे. काढून ठेवलेले सोयाबीन बाहुन गेले आहे.

नदी नाल्यालगतच्या पिक व जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना सरसकट भरीव आर्थिक मदत मिळाली पाहिजे. शहरातील अण्णा भाऊ साठे चौक येथील दुकानात पाणी शिरून नुकसान झालेल्या किराना, कापड, फुटवेअर, फर्निचर आदी ४० हून अधिक दुकानांची पाहणी केली. या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्तांना एनडीआरएफ निकषांप्रमाणे सरकारने मदत द्यावी, अशी मागणी आमदार धिरज देशमुख यांनी केली.

आ. देशमुखांच्या सूचना

पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज असल्याने प्रशासनाने दक्ष रहावे. पुन्हा पूरस्थिती उद्भवणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. झालेल्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्तांना एनडीआरएफ निकषांप्रमाणे मदत द्यावी.

## बिल्किस बानोप्रकरणी गुजरात सरकारची पुनर्विचार याचिका फेटाळली



नवी दिल्ली

बिल्किस बानो अत्याचार आणि कुटुंबातील सात सदस्यांच्या हत्या प्रकरणातील दोषी असलेल्या ११ जणांना देण्यात आलेली माफी रद्द करताना गुजरात राज्याविरोधात काही निरीक्षणे सर्वोच्च न्यायालयाने नोंदवली. न्यायालयाच्या या निकालाचे पुनरावलोकन करण्याची मागणी करणारी गुजरात सरकारची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने खुल्या न्यायालयात पुनर्विचार याचिका सूचिबद्ध करण्याचा अर्जही फेटाळला. ''पुनरावलोकन याचिका, आव्हानाधीन आदेश आणि त्याबरोबर जोडलेली कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिल्यानंतर आम्ही समाधानी आहोत. त्यामुळे पुनरावलोकन याचिका फेटाळण्यात आली आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ८ जानेवारीच्या निकालात गुजरात सरकारविरोधात काही निरीक्षणे केली.

## सोन्याच्या खाणीत भूस्खलनामुळे 15 ठार, 12 बेपत्ता

इंडोनेशियात सध्या सुरू असलेल्या संततधार पावसामुळे एका बेकायदेशीर सोन्याच्या खाणीत भूस्खलन झाले असून या दुर्घटनेत किमान १५ कामगार ठार झाले आहेत. तर डझनभर अन्य कामगार बेपत्ता आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पश्चिम सुमात्रा प्रांतातील दुर्गम सोलोक जिल्ह्यात ग्रामस्थ सोन्याच्या कणांसाठी गुरुवारी खोदकाम करत होते तेव्हा आजूबाजूच्या डोंगरांवरचा चिखल खाणीत कोसळला आणि हे कामगार गाडले गेले, असे स्थानिक आपत्ती निवारण एजन्सी कार्यालयाचे प्रमुख इरवान एफेंडी यांनी सांगितले. किमान २५ लोक अजूनही गाडलेले असून बचावकर्त्यांनी जखमी झालेल्या तीन लोकांना जिवंत बाहेर काढले आहे. सुंगई अबू गावाजवळील सर्वात जास्त प्रभावित भागात शोध प्रयत्नांना चिखलामुळे अडथळा निर्माण झाला आहे.

## काँग्रेसवाल्यांनी सत्तेत राहूनही लातूरचा विकास केला नाही : माजी आ. कव्हेकर

लातूर | प्रतिनिधी



४० वर्षापासून सत्तेत राहणाऱ्या देशमुखांनी लातूर शहरामध्ये एकही उद्योग आणण्याचे काम केलेले नाही. परंतु तत्कालीन फडणवीस सरकारने मात्र लातूरच्या विकासात भर पाडण्यासाठी व शहरातील तरुणांना रोजगार मिळण्यासाठी रेल्वे बोगी कारखाना आणण्याचे काम केलेले आहे, असे प्रतिपादन भाजपा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले. पेठ, चांडेश्वर व खोपेगाव येथे जनसंवाद यात्रेत ते बोलत होते. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, रंजितसिंह पाटील कव्हेकर, ज्योतीराम चिवडे, रवींद्र कांबळे, नीळकंठराव पवार, गोपाळबुवा, सरपंच शिवाजी गायकवाड, सागर घोडके, मंदार कुलकर्णी, सिध्देश्वर उकीरडे, प्रल्हाद मोरे, नितीन पिटले, अरविंद मोरे, वसंत मोरे, श्रीहरी सादले, माधव गोमारे आदींसह अनेकांची उपस्थिती होती. कव्हेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र केलेले आहे. मोदींनी राज्यघटनेचा सन्मान करण्याचे काम केले. परंतु, राज्यघटनेला बदलण्याचे काम काँग्रेसने जगातील विविध देशाचे युध्द व कोरोना काळातील परिस्थितीवर हिंमतीने मात करीत भारत देशाची चौफेर प्रगती करण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केलेले आहे. त्यामुळे जगात सर्वाधिक गुंतवणूक भारतात होऊन भारत सर्वाधिक गतीने प्रगती करीत असल्याचे कव्हेकर म्हणाले. प्रास्ताविक निळकंठराव पवार व मोरे यांनी केले. सूत्रसंचालन विनोद करदुरे यांनी केले. आभार महेश बिरादार यांनी मानले.

## महाराष्ट्रात उद्यापासून केवळ ढगाळ वातावरण, 6 ऑक्टोबरनंतर पुन्हा पाऊस कोसळणार



गेली तीन-चार दिवस राज्यात पावसाने अनेक भागात धुमाकूळ घातला. बुधवारी 25 सप्टेंबरला मुंबई-पुणे शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने काहीकाळ जनजीवन विस्कळीत झाले होते. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. 26 सप्टेंबरला शासनाने मुंबई-पुणे शहरात शाळांना सुट्टी जाहीर केली. एवढेच नाही तर पावसामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुणे दौरा रद्द करावा लागला. येत्या दिवसांमध्ये पावसाचे वातावरण कसे राहील याबाबत हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी माहिती दिली आहे. ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात उद्यापासून म्हणजे 28 सप्टेंबरपासून आठवडाभर म्हणजे शनिवार दिनांक 5 ऑक्टोबरपर्यंत खान्देश नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर व सोलापूर व मराठवाड्यात अशा 18 जिल्ह्यात केवळ ढगाळ वातावरण राहून हळूहळू पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता. केवळ अगदीच तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे. तसेच मुंबईसह कोकण व विदर्भातील 18 जिल्ह्यात मात्र अशा प्रकारची उघडीपीची परिस्थिती ही 1 ते 5 ऑक्टोबर दरम्यानच्या पाच दिवसात जाणवू शकते.

मुंबई शहर व उपनगर, ठाणे व उपनगर, पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग अशा 7 जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील नंदूरबार नाशिक पुणे सातारा सांगली कोल्हापूर अशा 6 जिल्ह्यात अशा एकूण 13 जिल्ह्यातील तापी, गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यात मात्र पूर पाण्याची तीव्रता वाढू शकते, अशी माहिती मामिकराव खुळे यांनी दिली आहे. दरम्यान, सहा ऑक्टोबरनंतर पुन्हा पावसाची सक्रियता वाढून 13 ऑक्टोबर पर्यंत म्हणजे आठवडाभर महाराष्ट्रात पुन्हा मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता जाणवत असल्याचे माणिकराव खुळे म्हणाले. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर म्हणजे 16 ऑक्टोबरनंतर मान्सून केव्हाही निरोप घेऊ शकतो. अर्थात मान्सून निघून गेला तरी चक्रीवादळाचा सीझन चालु होत असल्यामुळे ऑक्टोबर महिन्याअखेर दरम्यानही महाराष्ट्रात पावसाची शक्यता नाकारता येत नसल्याचे खुळे म्हणाले.

## प्रमुख संस्थांमध्ये सगळीकडेच भाजपची माणसं... म्हणून जातगणना हवी - राहुल गांधी

चंदीगड | हरियाणातील प्रचार सभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात जातनिहाय जनगणनेवर भर दिला. निवडणूक आयोगात भाजपचे लोक, ईडी आणि सीबीआयसारख्या संस्थांमध्येही भाजपचे लोक आहेत. इथे तुम्हाला गरीब आणि इतर जातीचे लोक सापडणार नाहीत. त्यामुळेच आम्ही जात जनगणनेची मागणी करत आहोत असे ते म्हणाले. भारतीय जनता पार्टीचे लोक संविधानावर हल्ला करत आहेत. आम्ही त्यांना भारतात कोणाची लोकसंख्या किती आहे हे तपासायला सांगतो आहे. आरएसएस म्हणतो की जात जनगणना झाली पाहिजे, पण आतून नकार देते. तुम्हाला गरीब मागासलेला माणूस सापडणार कोणत्याही मोठ्या पदावर सापडणार नाही. हा लढा हरियाणा वाचवण्यासाठी नाही, तर भारताला वाचवण्यासाठी आहे. देशातील सर्व संस्था आरएसएसकडे सोपवण्यात आल्या आहेत, ज्यावर नागपूरचे पूर्ण नियंत्रण आहे. भारतातील 90 टक्के जनतेला त्यात कुठेही जागा नाही असा आरोप त्यांनी केला.

## बीडच्या बँकेत ३०० कोटींचा घोटाळा करून मथुरेत साधुच्या वेषात राहत होता, 'असा' सापडला पोलिसांच्या जाळ्यात



मथुरा | महाराष्ट्र पोलिसांच्या एका पथकाने वृंदावन पोलिसांच्या मदतीने मथुरा जिल्ह्यातील कृष्ण बलराम मंदिराजवळ एका व्यक्तीला अटक केली आहे. त्याच्यावर महाराष्ट्रात सुमारे 300 कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. स्थानिक पोलिसांनी सांगितले की, बबन विश्वनाथ शिंदे असे या व्यक्तीचे नाव असून तो महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील रहिवासी आहे. कृष्ण बलराम मंदिराला ब्रिटिशांचे मंदिर असेही म्हणतात. पोलिस अधीक्षक (शहर) डॉ. अरविंद कुमार यांनी सांगितले की, बबन शिंदे (63) याला अटक करण्यासाठी महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील उपनिरीक्षक एसएस मुरकुटे आणि सहायक उपनिरीक्षक तुलसीराम येथे आले होते. बरीच चौकशी केल्यानंतर तो ब्रिटीश मंदिराजवळ साधूच्या वेशात फिरताना आढळून आला. तपासादरम्यान शिंदे सुमारे एक वर्षापासून साधूच्या वेषात येथे राहत असल्याची माहिती मिळाली, तर महाराष्ट्र पोलिसांचे पथक मंदिर, आश्रम, हॉटेल, गेस्ट हाऊस आदी ठिकाणी त्याचा शोध घेत होते. पोलिसांनी त्याला नियमानुसार गुरुवारी न्यायालयात हजर केले, अशी माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली. पोलिसांनी त्याचा ट्रान्झिट रिमांड मिळवला आणि नंतर त्याला महाराष्ट्रात नेले. शिंदे याच्यावर महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील जिजाऊ माँ साहेब मल्टी स्टेट बँकेमधील ठेवीदारांचे ३०० कोटी रुपयांचा गंडा घालण्याचा आणि तेथून फरार झाल्याचा आरोप आहे.

फास्ट न्यूज

## तळवडेत साकारणार जैवविविधता उद्यान

पिंपरी : रेडझोनने प्रभावित असलेल्या तळवडेत जैवविविधता उद्यान (बायोडायव्हर्सिटी पार्क) विकसित करण्यात येणार आहे. ६० एकर जागेत हे उद्यान साकारण्यात येणार आहे. त्यासाठी ७६ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. स्वच्छतेची कामे करणाऱ्या भारत विकास ग्रुप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला (बीव्हीजी) हे काम देण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

तळवडे भाग रेडझोन प्रभावित आहे. त्यामुळे विकासकामे आणि पायाभूत सोईसुविधा देण्यात अडचणी येत होत्या. रेडझोन हद्दीतील ६० एकर गायरान जागेत जैवविविधता उद्यान साकारण्याचे निश्चित केले. त्यासाठी महापालिकेने निविदा प्रक्रिया राबविली. यात चार ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यांपैकी एक ठेकेदार पात्र ठरला. त्यामुळे महापालिकेने फेरनिविदा मागविली. त्यात भारत विकास ग्रुप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची एकमेव निविदा आली. त्यांनी दरापेक्षा ०.१० टक्के कमी दराची निविदा सादर केली. त्यांची ७५ कोटी ९३ लाख ८८ हजार रुपयांची निविदा स्वीकारण्यास आयुक्त सिंह यांनी मान्यता दिली. कामाची मुदत १८ महिने आहे. उद्यानात वेगवेगळ्या वनस्पती, दुर्मीळ औषधी झाडे व वेली, देशी जातीची झाडे, फळ व फूलझाडांची लागवड केली जाणार आहे. प्राणी, पक्षी अधिवास निर्माण करण्यात येणार आहे. शिवाय, पर्यटकांसाठी ट्रॅक, खाद्यपदार्थांचे स्टॉल, मनोरंजनाची साधनेही असणार आहेत. पर्यावरण प्रदूषण वसुंधरेचा ऱ्हास रोखण्याचे आव्हान मानवजातीसमोर आहे. चिखली-मोशी-चऱ्होली परिसरात मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात आहेत. पर्यावरणाचा समतोल टिकावा त्यासाठी जैवविविधता उद्यान उभारण्यात येत असल्याचे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाचे सहशहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले, की जैवविविधता उद्यान मानव आणि निसर्ग यांच्यातील अधिक शाश्वत आणि सामंजस्यपूर्ण सहअस्तित्वाचा मार्ग प्रकाशित करेल. पुनर्संचयित उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि सामुदायिक सहभाग याद्वारे पार्क जागरूक पर्यावरणीय कारभाराच्या परिवर्तनीय शक्तीचे उदाहरण देईल.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीला पिंपरी चिंचवडमध्ये शहराध्यक्ष मिळेना

पिंपरी | प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या असताना एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस दोन महिन्यांपासून शहराध्यक्षाविना आहे. शहराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात असलेल्यांना आमदारकीचे वेध लागले आहेत. त्यामुळे कधीकाळी शहराध्यक्षपद मिळवण्यासाठी रस्सीखेच असलेल्या राष्ट्रवादीत आता मात्र शहराध्यक्ष पद घेण्यास कोणी तयार होत नसल्याचे चित्र आहे.**




बारामतीखालोखल पिंपरी-चिंचवड शहरावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व होते. सलग १५ वर्षे महापालिकेत राष्ट्रवादीची एकहाती सत्ता होती. 'दादा बोले आणि प्रशासन डोले' अशी परिस्थिती होती. त्यामुळे राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षाला मोठे महत्व होते. या पदासाठी रस्सीखेच होत असे. अजित पवार यांनी भाजपसोबत सरकारमध्ये सहभागी होण्याची भूमिका घेतल्यानंतर संपूर्ण शहर कार्यकारिणी त्यांच्यासोबत राहिली. परंतु, लोकसभेला राष्ट्रवादीचा दारुण पराभव झाल्यानंतर राजकीय भवितव्यासाठी शहराध्यक्षांसह माजी नगरसेवकांनी पक्ष सोडला. भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अजित गव्हाणे यांनी १६ जुलै २०२४ रोजी राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला. समर्थक माजी नगरसेवकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाची पडझड रोखण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ माजी नगरसेवकांची बैठक घेतली. शहरात येत मेळावाही घेतला. अध्यक्षपदासाठी काही नावे आली आहेत. त्यांपैकी कोणाला अध्यक्ष करायचे याची चाचपणी करत असून, लवकरच अध्यक्षाची नियुक्ती केली जाईल, असे सांगितले. मात्र, त्याला अडीच महिने पूर्ण होत आले. परंतु, अद्याप शहराध्यक्षाची नियुक्ती झालेली नाही. शहराध्यक्षपदासाठी पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे, माजी महापौर योगेश बहल, जगदीश शेट्टी, नाना काटे, भाऊसाहेब भोईर यांची नावे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सुचविल्याचे सांगितले जाते. त्यांपैकी बनसोडे विधानसभा लढणार असून, बहल यांना राज्यपालनियुक्त आमदारकी देण्याची मागणी आहे. तर, काटे, भोईर हे चिंचवडमधून निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. त्यामुळेच त्यांनी शहराध्यक्षपद स्वीकारले नसल्याचे बोलले जाते. विधानसभा निवडणूक तोंडावर असतानाही शहराध्यक्ष निवडला जात नसल्याने पदाधिका-यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. कर्णधारच नाही तर लढायचे कोणाच्या नेतृत्वाखाली अशा बोलक्या प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून दिल्या जात आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवार यांना राज्यात लक्ष द्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांचे पुत्र पार्थ यांच्याकडे पिंपरी-चिंचवडची जबाबदारी दिल्याचे दिसते. कारण, पार्थ हे सातत्याने शहरात येऊन संघटनेचा आढावा घेत आहेत. गणेशोत्सवातही शहरातील सर्व मंडळांना त्यांनी भेटी दिल्या. शहराध्यक्ष एक पद असून आमचे सर्व पदाधिकारी शहराध्यक्ष असल्या सारखेच असल्याचे पार्थ यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते.

## ठाण्यात पुन्हा कचराकोंडीची चिन्हे डायघर प्रकल्पास ग्रामस्थांचा विरोध

ठाणे | प्रतिनिधी

ठाणे येथील डायघर भागातील कचरा प्रकल्प ठेकेदाराने देयके मिळत नसल्यामुळे घंटागाड्या प्रवेशद्वारावरच रोखून धरल्याने गेल्या दोन दिवसांपासून परिसरातील रस्त्यांवर घंटागाड्याच्या रांगा लागल्याने ग्रामस्थांनी प्रकल्पास विरोध दर्शविला. या प्रकारामुळे कळवा, दिवा आणि मुंब्रा भागातील कचरा संकलन ठप्प झाल्याने येथे रोगराईचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच प्रकल्पस्थळी अधिकाऱ्यांनी मारहाण करत जबरदस्तीने गाड्या सोडल्याचा आरोप करण्यात येत असून या वादानंतर ग्रामस्थांनी प्रकल्पाविरोधात दंड थोपटल्याने शहरात कचराकोंडी निर्माण होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, प्रशासनाने मात्र दावा फेटाळून लावत शहरात कचरा संकलन ठप्प झाल्याने प्रकल्पस्थळी वाहने सोडल्याचे स्पष्ट केले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज १ हजार मेट्रीक टनच्या आसपास कचरा निर्माण होतो. त्यात ६० टक्के ओला तर, ४० टक्के सुका कचरा असतो. राज्य शासनाने ठाणे महापालिकेला भिवंडीतील आतकोली भागात कचराभुमीसाठी नुकतीच जागा देऊ केली आहे. परंतु याआधी स्वतःची कचराभुमी नसल्यामुळे महापालिका दिवा भागात आणि त्यानंतर भांडर्ली कचरा टाकत होती. परंतु नागरिकांच्या विरोधानंतर येथे कचरा टाकणे बंद करत पालिकेने डायघर येथे १४ वर्षानंतर कचराप्रकल्पाची उभारणी केली. याठिकाणी कचऱ्यापासून वीज निर्मीती केली जाणार असल्याचे पालिकेने म्हटले होते. गेल्या वर्षभरापासून येथे कचरा टाकण्यात येत आहे. परंतु याठिकाणी कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया करण्यात येत नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांकडून प्रकल्पास विरोध होत आहे. त्यातच कामाचे देयक थकल्यामुळे ठेकेदाराने गेल्या दोन दिवसांपासून प्रकल्पास्थळी येणाऱ्या घंटागाड्या रोखून धरल्या होत्या. या वाहनांच्या रांगा परिसरातील रस्त्यांवर लागल्याने दुर्गंधीमुळे ग्रामस्थ हैराण झाले. तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्रामस्थांमधून काही वाहनांना माघारी पाठविल्या. तसेच प्रकल्पात कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया होत नसल्याचा आरोप करत प्रकल्पास विरोध दर्शविला होता. यामुळे कळवा, दिवा आणि मुंब्रा भागातील कचरा संकलन ठप्प झाल्याने येथे रोगराईचा प्रश्न निर्माण झाला होता. यानंतर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी सकाळी डायघर येथे जाऊन रोखून धरलेल्या घंटागाड्या प्रकल्पस्थळी सोडण्यास सुरुवात केली.

## रविवारी मेन, हार्बर मार्गांवर मेगाब्लॉक

मुंबई | उपनगरीय रेल्वेच्या देखभाल-दुरुस्तीकरिता रविवार, २९ सप्टेंबर रोजी मध्य रेल्वेच्या मेन लाईन आणि हार्बर मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे मुंबईकरांना रविवारची सुट्टी घरीच घालवावी लागणार आहे. दरम्यान, पश्चिम रेल्वेवर आज (शनिवारी) १० तासांचा मेगाब्लॉक, तर रविवारी रात्री हार्बर मार्गावर पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या दरम्यान, काही लोकल अंशतः रद्द करण्यात येणार आहेत. मेन लाईनवर माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन धिम्या मार्गावर सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉकदरम्यान धिम्या मार्गावरील वाहतूक जलद मार्गावरुन चालविण्यात येणार आहे. परिणामी, लोकल गाड्या आपल्या निर्धारित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिराने पोहोचणार आहेत. हार्बर मार्गावर कुर्ला ते वाशी दरम्यान अप आणि डाऊन दोन्ही मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत देखभाल-दुरुस्ती करण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत कुर्ला ते वाशी दरम्यानची लोकल वाहतूक पुर्णपणे बंद राहणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी ब्लॉकदरम्यान सीएसएमटी ते कुर्ला आणि कुर्ला ते पनवेलदरम्यान विशेष लोकल चालविण्यात येणार आहेत. तसेच हार्बर मार्गावरील प्रवासी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ठाणे ते वाशी नेरुळ स्थानकावरुन प्रवास करु शकतात. पश्चिम रेल्वे मार्गावरील सहाव्या रेल्वे मार्गाच्या नॉन-इंटरलॉकिंगची कामे करण्यात येणार आहेत. यासाठी रविवारी २९ सप्टेंबर रोजी रात्री अंधेरी ते गोरेगाव दरम्यान अप आणि डाऊन हार्बर मार्गावर पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे.

# धम्मभूमी बौद्ध लेणीला बजावलेल्या नोटीस विरुद्ध आंबेडकरी अनुयायांमध्ये तीव्र संताप



छ.संभाजीनगर | बौद्ध लेणी च्या पायथ्याशी मागील ६० ते ७० वर्षांपासून असलेले धम्मभूमी विशुद्धानंद महाबोधी विहार, प्रज्ञा प्रसार बुद्ध विहारांचे व भिख्खू कुटीस अतिक्रमण असल्याचे संबोधून बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या वतीने भारतीय न्याय संहितेच्या कलम 168 प्रमाणे नोटीस बजावण्यात आल्याने बौद्ध लेणीवर निर्णायक बैठक आज भिक्खु संघ व हजारों बौद्ध अनुयायांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत दि.०७ ऑक्टोबर ला मोर्चा काढण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. मागील ७० वर्षांपासून बौद्ध भिख्खू बौद्ध लेणीच्या पायथ्याशी असलेल्या विहारात वास्तव्यास आहेत, महाराष्ट्रातील लाखों कोटी बौद्ध अनुयायांचे हे श्रद्धेचे ठिकाण असल्याने खोडसाळ पणे बौद्ध लेणी ला अतिक्रमण संबोधून कायदा सुव्यवस्था बिघडविण्याचा हा प्रयत्न असल्याने पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांना तात्काळ पदावरून हटविण्यात यावे अश्या मागणीचे निवेदन घेऊन हजारोंचा आंबेडकरी जनसमुदाय हा पोलीस आयुक्त कार्यालयावर पोहोचला होता यावेळी सहा.पोलीस आयुक्त संपत शिंदे यांनी निवेदन स्वीकारले.

## 'लाडली बेबी योजना' आणणार, गर्भवती महिलांना दरमहा ५००० रुपये देणार, नैना चौटाला यांची घोषणा

चंदीगड



हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय धामधून सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर जननायक जनता पक्ष (जेजेपी) आणि आझाद समाज पक्ष (कांशीराम) या युतीचे सरकार स्थापन झाल्यास हरियाणातील गर्भवती महिलांसाठी 'लाडली बेबी योजना' लागू करण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली आहे. तसेच, या योजनेंतर्गत गरोदर महिलांची काळजी आणि आहारासाठी दरमहा पाच हजार रुपये दिले जाणार आहेत. याशिवाय, अंगणवाडी आणि आशा सेविकांचे मानधनही दरमहा २१ हजार रुपये करण्यात येणार आहे. यासंदर्भात जेजेपीच्या ज्येष्ठ नेत्या आणि आमदार नैना सिंह चौटाला यांनी घोषणा केली.

नैना चौटाला शनिवारी उचाना येथील अलेवा गावात आयोजित हरी चुनरी चौपाल कार्यक्रमात जमलेल्या महिलांना संबोधित करत होत्या. त्यावेळी, महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी जेजेपीने पंचायत राज संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण लागू केले होते आणि आता आमचे सरकार आल्यास शिक्षक भरतीतही महिलांना ५० टक्के आरक्षण दिले जाईल, असे नैना चौटाला यांनी सांगितले. तसेच, उपमुख्यमंत्री असताना दुष्यंत चौटाला यांनी महिलांच्या मान-सन्मानात कधीही कमीपणा येऊ दिला नाही, असेही नैना चौटाला म्हणाल्या.

याचबरोबर, महिलांनी एकजूट होऊन उचाना येथून दुष्यंत चौटाला यांना विजयी करा आणि त्यांना मुख्यमंत्री बनवण्यासाठी राज्यभरात चावी प्रत्येक घरापर्यंत पोहोचवा, असे नैना चौटाला म्हणाल्या. तसेच, एकीकडे जेजेपी महिलांना सोबत घेऊन पुढे जात आहे, तर दुसरीकडे काँग्रेस नेते बीरेंद्र सिंह यांनी महिलांना वांझ म्हणत आईच्या गर्भाचा अपमान केला आहे. महिलांना वांझ असा दर्जा देणारे काँग्रेसवाले कधीच महिलांना सन्मान देऊ शकत नाहीत, त्यामुळे महिलांनी मतदान करूनच आपल्या अपमानाचा बदला घ्यावा, असे नैना चौटाला म्हणाल्या.

## कोंढव्यात १४ लाखांचे मेफेड्रोन जप्त

पुणे | कोंढवा परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या दोघांना अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्यांच्याकडून १४ लाखांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले. जहीर उर्फ साद गनी खान (वय २०), आदनान शाबीर शेख (वय २५, दोघे रा. कोंढवा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि पथक कोंढवा भागात गस्त घालत होते. कोंढव्यातील ओपेल पलक सोसायटीसमोर दोघे जण थांबले असून, त्यांच्याकडे मेफेड्रोन असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. पोलिसांनी खान आणि शेख यांना पकडले. त्यांची झडती घेण्यात आले. दोघांकडून १४ लाख रुपयांचे ६३ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, उपनिरीक्षक दिगंबर चव्हाण, अझिम शेख, चेतन गायकवाड, प्रशांत बोमादंडी, संदीप जाधव, दिशा खेवलकर यांनी ही कारवाई केली.

# राज्यात महिला संचालित पर्यटनस्थळांची संख्या वाढणार

छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी



महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर, खारघर आणि नागपूर येथील महिला संचलित पर्यटन केंद्रांना पर्यटकांकडून त्यातही एकट्याने प्रवास करणाऱ्या महिला पर्यटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यात आणखी अशी केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत. राज्य शासन त्यासाठी विविध पर्यटनस्थळांचा अभ्यास करीत आहे.

राज्यातील अन्य पर्यटनस्थळांपेक्षा महिला संचालित स्थळांना पर्यटकांकडून तीस टक्के अधिक प्रतिसाद लाभला आहे. या केंद्रावरील निवासव्यवस्थेबरोबरच उपाहारगृह अन्य सेवा पर्यटकांच्या चांगल्याच पसंतीस उतरल्या आहेत.

पर्यटन क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा, त्यांचा आर्थिक विकास व्हावा तसेच त्यांच्यातील उद्योजकता वाढीस लागावी, यासाठी राज्य शासनाने गेल्या वर्षापासून महिला केंद्रित पर्यटन धोरण लागू केले. त्या अनुषंगाने महामंडळाच्या (एमटीडीसी) छत्रपती संभाजीनगर व अर्का उपाहारगृह, खारघर तसेच नागपूर येथील पर्यटनस्थळावर निवास, उपाहारगृहाचे व्यवस्थापन महिलांकरिता आहेत. महामंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून या योजना यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहेत.

पर्यटन हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. त्यामुळे महिलांचा पर्यटन क्षेत्रातील सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरू शकतो. त्यानुसार महिला उद्योजकता विकास, महिलांकरिता पायाभुत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत आहे. त्याचबरोबर महिला पर्यटकांसाठी विविध कस्टमाईज्ड उत्पादने, सवलती, प्रवास आणि पर्यटन विकास अशी धोरणाची पंचसुत्री आखण्यात आली आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे, उपाययोजना सुचविणे व संनियंत्रण करण्यासाठी पर्यटनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कृतिदलाची रचना करण्यात आलेली आहे.

पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजकांचा सहभाग वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत महिलांच्या मालकीच्या व त्यांनी चालविलेल्या 10 पर्यटन व्यवसायांना (होम स्टे, हॉटेल / रेस्टारंट, टुर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल एजन्सी आदी.) पर्यटन व्यवसाय उभारणीसाठी काही अटी आणि शर्तींच्या अधीन राहून विविध प्रोत्साहने आणि सवलती देण्यात येणार आहेत. नोंदणीकृत पर्यटन व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या महिला सहल मार्गदर्शक, महिला वाहनचालक, महिला सहल संचालक (टुर ऑपरेटर) व इतर महिला कर्मचारी यांना केंद्र राज्य शासनाच्या विमा योजनेमध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे.

निकाल लावायचा आहे, ते जनतेने ठरवावे...

# घटना उद्ध्वस्त करण्याचा भाजपचा होता प्लॅन : शरद पवार

पुणे | प्रतिनिधी



लोकसभा निवडणुकीत भाजपने चारशेपारचा दावा केल्यामुळे महाविकास आघाडीचे नेते चिंतेत होते. चारशे जागा नेमक्या कशासाठी पाहिजेत? याचा विचार केल्यावर समजले की, घटनेची चौकट उद्ध्वस्त करण्याचा त्यांचा प्लॅन होता. त्यामुळे आम्ही इंडिया आघाडी बनवली आणि लोकसभा निवडणुकीत राज्यात 31 जागा जिंकून दाखवल्या, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

खराडी येथील पठारे इनडोअर स्टेडियममध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शुक्रवारी महानिर्धार मेळाव्याचे आयोजन केले होते, त्या वेळी ते बोलत होते. माजी आमदार बापूसाहेब पठारे आणि सुरेंद्र पठारे यांच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन केले होते. आमदार अशोक पवार, रोहित पवार, पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, खासदार वंदना चव्हाण, पक्षाचे वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष आशिष माने, माजी आमदार जयदेव गायकवाड, माजी नगरसेवक महेंद्र पठारे, शैलेश राजगुरू आदी या वेळी उपस्थित होते. या वेळी माजी नगरसेवकांसह इतर पक्षांतील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शरद पवार म्हणाले की, चुकीच्या गोष्टीला पाठिंबा देणे चुकीचे आहे. पोर्शे कार अपघातातील जखमींना मदत करायची सोडून येथील आमदाराने पोलिस स्टेशनला जाऊन पोलिसांवर दबाव आणला आणि अपघातातील आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केला. तरुण व्यसनाच्या आहारी जात असताना येथील 'आमदार दमदार' असल्याचे बोर्ड लावत आहेत. पोर्शे कार प्रकरणात या आमदाराचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे पोलिसांनी सांगितले. यामुळे या आमदाराचा काय निकाल लावायचा आहे, ते जनतेने ठरवावे, अशी टीका शरद पवार यांनी नाव न घेता स्थानिक आमदारांवर केली. बापूसाहेब पठारे यांनी आपल्या आमदारकीच्या कारकिर्दीत केलेल्या विकासकामांचा आढावा भाषणातून घेतला. ते म्हणाले, 'या भागात आयटी पार्क उभे राहिल्यामुळे युवकांना रोजगार मिळू शकला आहे. यापुढे काम करून पुणे महापालिकेत शरद पवार यांच्या विचाराची सत्ता आणू.' रोहित पवार, प्रशांत जगताप यांनीही मनोगत व्यक्त केले. सुरेंद्र पठारे यांनी स्वागत केले. राज्य सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. राज्यात महिला आणि मुलींवर होणारे वाढते आत्याचार पाहता आज त्यांना पैशाऐवजी संरक्षणाची खरी गरज आहे.

## कन्हानमध्ये होणार राज्यातील पहिली महिला एमआयडीसी

नागपूर | राज्याच्या औद्योगिक उभारणीमध्ये महिलांनाही प्राधान्य मिळावे, हक्काची जागा मिळावी, उद्योजक म्हणून त्यांनाही आपली ओळख निर्माण करता यावी यासाठी लवकरच विदर्भात महिलांसाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात येत आहे. राज्यातील पहिली महिला एमआयडीसीनागपूर जिल्ह्यातील कन्हान येथे उभारण्यात येणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. शुक्रवारी नागपुरात हॉटेल सेंटर पॉइंट येथे महाराष्ट्राची उद्योग भरारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर आयोजित पत्रकार परिषदेत उद्योगमंत्री सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आ. आशिष जयस्वाल उपस्थित होते. सामंत यांनी सांगितले, नागपुरातील एमआयडीसीतील जागा आता संपलेली आहे. उद्योगांसाठी नवीन जागेची गरज आहे. त्यामुळे आमडी येथे ३ हजार एकरवर नवीन एमआयडीसी उभारण्यात येणार आहे, असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. महाराष्ट्रात वीज टेरीफ जास्त आहे. विदर्भातील टेरीफचे वीज दर कमी झाले नसेल तर ते लवकरच केले जाईल, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. उद्योगासाठी जागा घेतली परंतु त्याचा उपयोगच केला नाही, अशा उद्योगांची जमीन शासन आपल्या ताब्यात परत घेत आहे.

मुद्रक प्रकाशक संतोष कोठावदे यांनी दैनिक बहुजनरत्न लोकनायकचे मालक शुभम कुंदन गोटे यांच्या करीता हे दैनिक द मिलेनियअम प्रिंटर्स १४, अ, तळमजला, सीताराम मील, जेकब सर्कल लोअर परेल मुंबई - ४०००१३ येथे छापून एस-२ २०७, पुर्णशांती हाईट्स, खारटन रोड, ठाणे (प.) - ४००६०१ येथे प्रसिध्द केले. *संपादक - संतोष गोविंद कोठावदे, कार्यकारी संपादक - गणेश शामराव निकुंभ (*पी.आर.बी. कायद्यानुसार छापुन आलेल्या मजकुरास कार्यकारी संपादक जबाबदार राहतील, न्यायालयीन क्षेत्र मुंबई) Email - bloknayak23@gmail.com जाहिरात विभाग - ९८६७०२४६२४.